MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पंधरावे / अंक ४ / एप्रिल २०१५

## संपादकीय

### घडीने घडी काळ आयुष्य नेतो!

'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए', हे हिंदी चित्रपटसृष्टीतील खूप गाजलेले वाक्य आहे. नियतिशरण असल्याने माणसे कायम कुणासमोर तरी, कशासमोर तरी, हतबल होतात व यातूनच 'सत्ता' हा विषय पुढे येतो. खरे पाहता, एकीकडे अत्यंत उबगलेली, कंटाळवाणी अशी जीवनगाणी माणसे आयुष्यभर गात असतात. ती एकमेकांना किंवा एखादी घटना, एखादी वस्तू, एखादी संकल्पना त्यांना अतिशय नकोशी वाटायला लागते आणि एका अनामिक अशा खिडकीत बसून ती वाट पहात राहतात.

एखादे लहानगे बालक ज्या उत्सुकतेने दूरवर गेलेल्या आपल्या आईची वाट पाहते, तशीच हे वाट पाहणे असते. अशा वाट पाहण्यात काहीतरी बरे होईल, आज नाही तर उद्या एखादा नवा सूर्य उगवेल अशी जन्मजात भावना माणसाच्या मनात असते. त्यासाठी माणूसं 'आज'चा स्वीकार करत रहातो. टोकाच्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडत जगायचा प्रयत्न करत रहातो. मनात खोलवर 'वो सुबह कभी तो आएगी' ही आशा बाळगून जगत रहातो.

'सत्ता' आणि 'सत्ता बदल' हे विषय मानसशास्त्रीय दृष्ट्या अशा गहन मनोविचारांशी संबधित आहेत. आजच्या काळाचा संदर्भ लक्षात घेता मानवी अस्तित्वावर असणारा ताणतणाव, अर्थसत्ता आणि वैद्यकसत्ता यांचा प्रभाव वाढत चाललेला दिसतो. या दोन्ही सत्तांमध्ये अनेक असे व्यवहार व गैरव्यवहार किंवा भ्रष्टाचार यांचे अंतःप्रवाह वहात असतात. याशिवाय, तिरस्करणीय किंवा महान मानल्या जाणाऱ्या अशा राजकारणी मंडळींचे सत्ताक्षेत्र हा प्रांतही प्रबळ होत चाललेला आहे. हे राजकीय क्षेत्र केवळ स्थानिकच नव्हे, जागतिक स्तरावर आपले अस्तित्व शतकानुशतके टिकवून आहे. गारपीट, दुष्काळ, भूकंप, वादळ अशा कोणत्याही नैसर्गिक संकटांचे संधीत रूपांतर करणाऱ्या करू शकणाऱ्या मंडळींचा या क्षेत्रात वावर असतो; तसेच जगभर होणारे विमानांचे अपहरण, विमानांचे, जहाजांचे अपघात, दंगली, दहशतवाद, वंशभेद अशा अनेकानेक प्रांतांवर या राजकारण्यांचा वरचष्मा असतोच.

गेल्या पंधरा वीस वर्षांत जगभर पसरत चाललेल्या आंतरजालामुळे विचारांच्या परंपरांची सत्ता, ग्रंथांची सत्ता यांना धक्का बसत असतानाच, दुसरीकडे या ग्रंथसत्तेचे महत्त्व जाणवलेले अनेक विचारवंत, शास्त्रज्ञ यांचा व्यासंगही असतो.

(पृष्ठ क्र. ९ वर)

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म (शनिवार व महाशिवरात्र होती.) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२-४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ |
| १९४४ | विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला. याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३नोव्हें.) |
| १९४७ | डॉ. विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर) |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे) |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम |
| १९५२-५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना |
| १९५७ | विद्या प्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथ. विभाग) प्रारंभ |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढविली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात |
| १९७५ | विज्ञान महाविद्यालयाचे विभक्तीकरण |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल) |
| १९८३ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले |
| १९९९-२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २०००-२००१ | जोशी-बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास) |

(संकलन श्री. शरद लळित)

वर्ष पंधरावे/अंक ४/एप्रिल २०१४

वर्ष पंधरावे/अंक ४/एप्रिल २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. मोहन पाठक | |
| २) | युनिव्हर्सिटी चर्च | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | ५ |
| ४) | सकळ जन | श्रीमती आशा भिडे | १० |
| ५) | अन्न हे पूर्ण ब्रह्म | प्रा. सुचित्र आ. नाईक | १२ |
| ६) | नर्मदा परिक्रमा<br>भाग : ४ | श्री. अरविंद ओक | १७ |
| ७) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय पंधरावा<br>विषय : पुरुषोत्तम योग | कै. शं. बा. मठ | २४ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २८ |
| ९) | खरंच सांगतो, ती वाचन-उत्सुक<br>गोड मुलं आहेत! | डॉ. प्रदीप कर्णिक | ३९ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगी मूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# युनिव्हर्सिटी चर्च

*ऑक्सफर्डच्या युनिर्व्हसिटी चर्चचे वर्णन या लेखात आले आहे – संपादक*

आदल्या दिवशी विद्यापीठ परिसरात फेरफटका मारताना दुपारचा चहा आम्ही एका चर्चच्या कँटीनमध्ये घेतला होता. तेथून बाहेर पडताना त्या चर्चबद्दल वरीच माहिती आम्हांला मिळाली. त्यामुळे चर्चला भेट द्यायचे आम्ही ठरविले. त्यानुसार चर्चच्या प्रवेशद्वारातून आम्ही प्रवेश केला. तेथील एका बाईने आमचे स्वागत केले. आम्ही भारतातून शैक्षणिक सहलीसाठी आलो हे कळल्यानंतर त्या बाईने आम्हाला नवनवीन माहिती द्यायला सुरुवात केली.



**चर्चची इमारत**

सेंटमेरी द व्हर्जिन असे त्या चर्चचे नाव आहे. परंतु लोक त्या चर्चला युनिव्हर्सिटी चर्च या नावानेचे ओळखतात. याचे कारण याच चर्चमध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठाची सुरुवात झाली. शैक्षणिक संस्था सुरू करण्यासाठी ऑक्सफर्डमध्ये आलेल्या व्यक्तींना हे चर्च सोयीचे वाटते. विद्यापीठाचा सुरुवातीचा आराखडा येथेच तयार करण्यात आला. एवढेच नव्हे तर सुरुवातीच्या काळात याच चर्चमध्ये वर्ग भरविण्यात येत असत. त्यासाठी चर्चला जोडूनच बाजूला एक दुमजली इमारत बांधण्यात आली. त्या इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या कँटीनमध्ये आम्ही चहा घेतला. जेथे आता कँटीन आहे तेथे कधीकाळी विद्यापीठाचे वाचनालय होते. वाचनालयाला वेगळी जागा मिळाल्यावर या जागेचा प्रयोग वर्गखोली म्हणून करण्यात येत असे. आता प्रत्येक कॉलेजला स्वतंत्र वाचनालय आणि वर्गखोल्या असल्याने ही जागा रिकामीच आहे. या जागेचा कँटीनसाठी शिताफीने उपयोग करून घेतलेला आहे.

चर्चच्या इमारतीला एक बाजूला मनोरा आहे. वर जाण्यासाठी पायऱ्या केलेल्या आहेत. आपल्याला जर वर जायचे असेल तर शुल्क भरावे लागते. वरून संपूर्ण विद्यापीठाचा परिसर दिसतो असे तेथील व्यक्तीने आम्हाला सांगितले. म्हणून आम्ही तिकिट घेऊन पायऱ्या चढू लागलो. वरच्या मजल्यावर पोहोचण्यासाठी जवळपास २०० पायऱ्या चढाव्या लागतात. प्रत्येक पायरीतील अंतर बरेच आहे. त्यामुळे दमछाक तर होतेच, त्याचबरोबर गुडघे दुखू लागतात. परंतु एकदा वर पोहोचलो की त्या सर्वांचा विसर पडतो. खरोखरच संपूर्ण विद्यापीठ परिसर आपल्या नजरेच्या आवाक्यात येतो. सगळीकडे दगडाच्या इमारती दिसतात. या सगळ्या इमारती अतिशय दाटीवाटीने बांधलेल्या आहेत. विद्यापीठ परिसरात झाडांची संख्या मर्यादितच आहे. ब्रिटिश लोकांनी त्याकडे कसे दुर्लक्ष केले याचे जरा आश्चर्यच वाटते.

चर्चची आतील रचना खूपच चांगली आहे. सगळ्या मोठ्या चर्चमध्ये असतो तसा एक बँड येथे आहे. बसण्यासाठी पुरेशा बाकांची सोय केलेली आहे. एका टोकाला मेरी आणि येशू ख्रिस्त यांचे पुतळे आहेत. त्याचबरोर चर्चची माहिती देणारे अनेक फलक तेथे लावलेले आहेत. मुळातले कॅथॉलिक पंथाचे ते चर्च आहे. जेव्हा इंग्लंडमधील काही लोकांनी कॅथॉलिक पंथाच्या तत्त्वांना विरोध करायला सुरुवात केली तेव्हा त्यांच्याविरूध्द कारवाई करण्यात आली. लॅटिसर यांच्यावर गुन्ह्याचा खटला याच चर्चमध्ये चालविला गेला. त्याचा शेवट कुठे आणि कसा झाला, हे आम्ही आदल्या दिवशी विद्यापीठ परिसरातून फिरताना पाहिलाच होता. जेथे आता क्रॉस आहे तेथे त्यांना जाळून पुरण्यात आले होते.



**सर विलियम जोन्स यांचा साधू वेशातील पुतळा**

युनिव्हर्सिटी चर्चला भेट देण्यामागे आणखी एक महत्वाचे कारण होते. या चर्चमध्ये विलियम जोन्सचा साधूवेशातील पुतळा आहे. या पुतळयाची कहाणी तशी मनोरंजक आहे. विलियम जोन्स (Willaim Jones) नावाचा एक ब्रिटिश अधिकारी १७८५ ते १७९५ या काळामध्ये कलकत्याच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करीत होता. भारतीय लोकांना न्याय देण्यासाठी त्यांच्या धर्मग्रंथात काय लिहिले आहे याची त्याला माहिती करून घ्यायची होती. ती करून घेण्यासाठी त्यांनी कलकत्यातील काही संस्कृत पंडितांची मदत घेतली. त्यांनी मनुस्मृतीत सांगितलेले नियम त्याला समजावून सांगितले. सामाजिक संबंधांचा परिपूर्ण विचार करणारा हा ग्रंथ असे त्याचे मत झाले. म्हणून तो संस्कृत शिकला आणि मनुस्मृतीचे त्याने इंग्रजीमध्ये भाषांतर केले. एवढा माहितीपूर्ण ग्रंथ इंग्रजी भाषेत उपलब्ध करून दिला. म्हणून त्याचा सन्मान करण्यासाठी त्याचा पुतळा उभारलेला आहे. या पुतळ्यात असलेला त्याचा गणवेश एखाद्या भारतीय साधूने परिधान केलेल्या गणवेशासारखा आहे. पुतळ्याचा डाव्या हातात पुस्तक असून त्यावर देवनागरी लिपित ''मनुः'' असे लिहिलेले आहे. विलियम जोन्सचा याहीपेक्षा मोठा पुतळा लंडनच्या सेंट पॉल चर्चमध्ये असल्याचे कळते. भारतात आपण या ग्रंथाला नाव ठेवतो, त्याची होळी करतो. तिकडे दूर इंगलंडमध्ये मात्र या ग्रंथाचा आणि ग्रंथाकाराचा सन्मान केला जातो. ज्ञानाची लालसा काय असते याचीच प्रचिती आपल्याला अशा बाबीतून दिसते. इंग्रजांच्या ज्ञानलालसेचे कौतुक करीतच आम्ही चर्चच्या बाहेर पडलो.




**ऑक्सफर्डचे उंचीवरून दर्शन घेण्याची संधी**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# साहित्य - जगत

*दोन अतिशय वाचनीय पुस्तकांवर या वेळच्या सदरात श्री. शरद जोशी लिहित आहेत - संपादक*

**ब्रह्मपुत्राच्या किनाऱ्या किनाऱ्याने - एक अप्रतिम पुस्तक**

जुलै २०११ 'अक्षर' प्रकाशनाने (२१४१, बी, निर्माल्य प्लाझा, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर, फोन नं. ०२३१-२ ६४६४२४) हे अप्रतिम पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे मूळ लेखक आहेत सांवरमल सांगानेरिया-मराठी अनुवाद विजय हरिपंत शिंदे, ए-१०१, शिंदे अपार्टमेंट, प्रतिभा नगर, कोल्हापूर - ४१६००८, फोन नं. ०२३१ - २६९६३२२; मो. ९४२३९८१२२९.

**अनुवादकाचे मनोगत**

आसाम आणि मूळ आसामातून निर्माण केलेली सात राज्ये यांच्या भारताशी व भारतीय संस्कृतीशी असलेल्या संबंधांबाबत श्री. मधुकर लिमये यांनी लिहिलेल्या 'बृहत्तर आसाम की कथाएँ' या तीन भागांत लिहिलेल्या कथा वाचून माझ्या मनातील उत्सुकता वाढत गेली. मग तेथील इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा पूर्ण करण्याच्या दृष्टीने शोध सुरू केला. गुवाहाटीचे श्री. सांवरमल सांगानेरिया यांनी लिहिलेले 'ब्रह्मपुत्र के किनारे किनारे' हे पुस्तक वाचण्याची शिफारस केली. हे पुस्तक मला गुवाहाटीच्या हेरिटेज फौंडेशन पुस्तक प्रकाशनच्या ऑफिसमध्ये मिळाले.

'आसाम आणि आसामातील सात राज्ये त्या प्रदेशांच्या दुर्गमतेमुळे, राजकीय उदासीनतेमुळे, जेत्यांनी लिहून ठेवलेल्या अभ्यासक्रमातील इतिहासामुळे, त्याचप्रमाणे वाहतुकीच्या गैरसोयींमुळे आजही भारतीय जनमानसात, राज्यकर्त्यांमधील आसामच्या गौरवशाली इतिहासातील उदासीनता हे सारं काही बेचैन करणारं आहे. देशाच्या सांस्कृतिक घडामोडीत फार मोठा वाटा असलेल्या आसामचा इतिहास मराठी वाचकांसमोर ठेवण्याचा संकल्प केला.'

**मूळ लेखकाचा परिचय व त्यांचे मनोगत**

श्री. सांवरमल सांगानेरिया हे मूळचे गुवाहाटीचेच. गुवाहाटीत प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक 'जागृती'चे ते काही काळ सहसंपादक होते. १९९९ मध्ये परिदृश्य प्रकाशनाकडून भारत यात्रेसंबंधी, थोडी यात्रा थोडे कागज हे त्यांचे प्रवास वर्णनाचे पुस्तक प्रकाशित झाले.

या पुस्तकाला २००१ मध्ये 'अखिल भारतीय अम्बिका प्रसाद दिव्य पुरस्कार' मिळाला. आसामचे प्रसिद्ध साहित्यिक, सिनेनिर्माते ज्योतिप्रसाद आगरवाल यांच्या जीवनावर 'ज्योति की आलोक यात्रा' हे चरित्र सन २००३ मध्ये गुवाहाटीच्या आसाम साहित्यसभा यांच्याकडून प्रकाशित केले गेले. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांच्याकडून २००४ मध्ये मुन्शी प्रेमचंद पुरस्कार देऊन सन्मान केला गेला. २००६ साली भारतीय ज्ञानपीठ कडून त्यांचे 'ब्रह्मपुत्रके किनारे किनारे' पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाची अनुवाद प्रक्रिया चालू आहे. (प्रस्तुतच्या 'ब्रह्मपुत्रके किनारे किनारे' या पुस्तकाला पुणे मराठी ग्रंथालयातर्फे ना. के. बेहेरे पुरस्कार मिळाला). त्यांचे चौथे पुस्तक 'अरुणाचल के धरतीपर' हेरिटेज फौंडेशनने प्रकाशित केले आहे आणि जुलै २०१० मध्ये

धर्म भावनेच्या बुडाशी सामाजिकता असतेच असते. - दुर्गा भागवत

आसामचे प्रसिद्ध वैष्णव संत शंकर देव यांच्यावर लिहिलेली कादंबरी (लोहितके मानसपुत्र 'शंकरदेव') प्रसिद्ध झाली. ते आपल्या मनोगतात म्हणतात,

'ब्रह्मपुत्र आणि आसाम एक दुसऱ्याचे पर्यायवाचक शब्द आहेत. ब्रह्मपुत्र शिवाय आसामची कल्पनाच करता येत नाही. ब्रह्मपुत्रने केवळ आसामचा भूगोलच रचला नाही, तर आसामचा इतिहासही आपल्या डोळ्यांसमोर घडताना पाहिला आहे. आसामच्या पर्वतीय प्रदेशातच कामरूप, हैडंब, शोणितपूर, कौडिल्य इ. राज्ये निर्माण झाली, वाढली आणि ऱ्हासही पावली. अगदी पूर्वेकडील पटकाईच्या दऱ्या ओलांडून आहोम घराणे आसामत ब्रह्मपुत्रच्या साक्षीने सहाशे वर्षे राज्य करीत होते. खरं म्हणजे, आणखीही अत्यंत महत्वाची अशी माहिती (लोकजीवन, ग्रंथनिर्मिती, मंदिरे इ. इ. संबधी) या मनोगतांत आहे ती मुळातूनच वाचावयास हवी.

**पुस्तकाचे अंतरंग**

एकदंर २७ प्रकरणांतून आसामविषयी सर्वांगीण माहिती अत्यंत विस्तृत रूपाने दिलेली आहे. ती सर्व माहिती वाचकाला सुखद धक्का देणारी, दिग्मुढ करणारी आहे. एकेक प्रकरण वाचताना वाचक आचंबित होऊन जातो. भारतीयांच्या मनामध्ये आसामबद्दल बऱ्याच विचित्र कल्पना ठाण मांडून बसलेल्या आहेत. आसामबद्दल अनेक भारतीयांच्या मनात एक अज्ञात भीती भरून राहिलेली आहे. या शंका-कुशंका दूर व्हाव्यात या उद्देशाने लेखकाने हे पुस्तक लिहिले. त्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. (आसामातील अनेक स्थळांना भेटी दिल्या, अनेक विद्वानांशी चर्चा केली, आसामी, हिंदी, इंग्रजी इ. भाषांतील अनेक पुस्तके वाचली, अभ्यासली. श्री. शंतनू कौशिक बारुआ यांच्या 'असम अभिधान' आणि प्रदीप बारुआ यांचे 'चित्र-विचित्र असम' ही पुस्तके त्यांनी अत्यंत उपयुक्त वाटली. हिंदी लेखक श्री. नवारुण वर्मा आणि श्री. मधुकर लिमये यांच्या पुस्तकांतून त्यांना खूपच मूलभूत आणि तथ्यपूर्ण माहिती मिळाली.) एका उत्तम पुस्तकांची निर्मिती केल्याबद्दल लेखकास धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. पुस्तकाचे अनुवादक श्री. विजय शिंदे यांचेही मनःपूर्वक अभिनंदन आणि अक्षर प्रकाशनाला धन्यवाद.

**अवश्य वाचावे असे माहितीपूर्ण पुस्तक**

प्रत्येक मराठी वाचकाने हे पुस्तक अवश्य वाचावे. सर्व ग्रंथालयांनी हे पुस्तक संग्रही ठेवून वाचकांना हे पुस्तक उपलब्ध करुन द्यावे ही विनंती. प्रा. सुलभा कोरे यांची सुंदर प्रस्तावना आहे. त्या म्हणतात, या पुस्तकाने मराठी वाचकासांठी एक आगळं वेगळ विश्व खुलं करुन दिलंय. वेगवेगळ्या भाषांतील साहित्याला वेगवेगळ्या भाषांत पोहचवून भाषाभाषांत एक सुंदर सामंजस्याचा पूल बांधण्याचे काम अनुवादक करीत असतो. अनुवादक हे त्या त्या भाषांचे दूतच असतात. अनुवादक विजय शिंदे असेच एक दूत बनले आहेत. त्यांचेही कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

**'दिव्यत्वाची जेथ प्रचिती' – एक अपूर्व पुस्तक असंख्य संकटांवर मात**

दिव्यत्वाची जेथ प्रचिती (ले. प्रमोद केणे) हे एक अपूर्व असे पुस्तक आहे. प्रकाशक आहेत-जय गिरधारी, दत्त मंडळ (६ बी, एस.टी. वसाहत, चिचबंदर, केशवजी नाईक रोड, डोंगरी, मुंबई - ४००००९) पृ. १५४ मूल्य रु. २००/- प्रथम आवृत्ती १०.१२.२०१२, दुसरी आवृत्ती १०.३.२०१३. (श्री. केणी यांच्या गिरनार १०८ यात्रा) झाल्या. त्यांची रोमहर्षक माहिती हा पुस्तकाचा विषय आहे.)

जगाच्या रक्षाणासाठी व कल्याणासाठी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांनी एकरुप होऊन 'दत्तावतार' घेतला.

कलियुगांत दत्तभक्ती श्रेष्ठ मानली गेली आहे. गुजरातमधील जुनागढ जवळचा गिरनार पर्वत, हे श्रीदत्त महाराजांच्या जागृत स्थानांपैकी एक. दहा हजार पायऱ्या व साडेतीन हजार फूट उंची चढून गेल्यावरच स्वयंभू दत्त पादुकांचे दर्शन होते. श्रद्धेची कसोटी पाहणाऱ्या गिरनार यात्रेचे महत्त्व प्राचीन काळापासून आहे. श्री. प्रमोद केणे हे विज्ञान शाखेचे पदवीधर, सांसारिक व एक छोटे उद्योजक. दत्त भक्तांची ज्योत अंतरी निर्माण होऊन त्यांनी थोड्या-थोडक्या नव्हे तर चक्क १०८ गिरनार यात्रा केल्या. त्याही कशा? तर सलग, अखंडित, दर पौर्णिमेला, रात्रीच पर्वत चढून, कडाक्याची थंडी, तीव्र उन्हाळा कोसळता पाऊस, धंद्यातील संकटे, तीव्र आर्थिक अडचणी, कशाचीही पर्वा न करता. भगवत्कृपेच्या आड येणारी बंधने तोडणे हीच साधना - श्रद्धा-भक्ती यांच्या बळावर आपण काय करू शकतो याचे हे उदाहरण.

श्री. केणे यांच्या ठायी श्रद्धा-भक्ती अनुभूती, विज्ञान यांचा अपूर्व असा संगम आहे. ४ जून २०१२ रोजी त्यांचा हा संकल्प पूर्ण झाला. या गिरनार यात्रांत त्यांना विलक्षण अनुभव आले. ते त्यांनी विज्ञानाच्या कसोटीवर तोलले. यांतील काही मोजके अनुभव ते भक्तीमार्गावर असलेल्या साधकांसाठी पूर्व आदेशानुसार मोकळे केले. (बेचाळीस वाऱ्यांपर्यंत त्यांची हे अनुभव कुणाला सांगितले नव्हते. त्यांचे आनंदस्वामी महाराज यांनाच फक्त सांगितले होते. मग महाराजांच्या आदेशावरून त्यांनी ते इतरांना सांगावयास सुरू केले. तेच पुढे पुस्तकरूपाने साधकांसमोर आले. प्रस्तावनेत ते म्हणतात, ''या पुस्तकास मी वेळोवेळी अहंकाराचे, 'मी'पणाचे मायाजाळ विस्तृतपणे निदर्शनास आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न माझेच उदाहरण देऊन केला आहे. तेच सापशिडीच्या खेळातील सापाचे मुख आहे. त्यापासून स्वतःला वाचविलेत, तर जीवनातील उंची गाठू शकाल. '' त्यांचे एक मित्र सामंत म्हणतात, '' हे पुस्तक नव्हे तर एक पोथी आहे. तेव्हा ही पोथी भक्तिभावाने वाचून जगदीश्वराला शरण जावे व आनंदी जीवनाची अनुभूती घ्यावी ही वाचकांना प्रार्थना''.

### वाचकांच्या प्रतिक्रिया

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने ते म्हणतात, 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती' हे पुस्तक वाचून मी भारावून गेलो. ''मला साक्षात गिरनारवर असल्याचा भास झाला. 'अप्रतिम' अशा प्रतिक्रिया काही प्रतिथयश लेखक वाचकांनी मला कळविल्या. एकाने तर असा अभिप्राय दिला, 'पुस्तक वाचताना डोळ्यापासून अविरत ओघळणाऱ्या जलधारांनी काही वेळा पुस्तक मिटवून स्वतःतच हरवून जात होतो.'' वाचकांच्या अशा उत्स्फूर्त प्रतिसादांची मला कल्पनाही नव्हती, हे सारे माझ्यासाइी अनपेक्षितच होते. पण त्यामुळे एक गोष्ट माझ्या ध्यानात आली, की माझ्यासारख्या लेखन शास्त्रातील कंकरालाही महाराजांचा स्पर्श झाल्यावर काय होते याची दिव्य अनुभूती मी घेत आहे. खरोखरीच आज मला गुरुचरित्राची आठवण प्रकर्षाने येते. मूढ ब्राह्मणाला ज्याप्रमाणे मस्तकी हात ठेवून महाराजांनी ज्ञानी केले, तद्वतच या मूढाला महाराजांनी लेखक बनविले. त्यांच्या अगाध लीला तेच जाणोत!'' वाचकांच्या या अभूतपूर्व प्रेमवर्षावाबद्दल मी आजन्म त्यांचा ऋणी राहीन. या पुस्तकाच्या माध्यमातून आपले प्रेम विश्वमूर्तीशी जोडले जाऊन वृद्धिंगत व्हावे, हीच कामना''.

### श्री. नागेश करंबेळकर (वापी, गुजरात) यांचा सुंदर अभिप्राय

पुस्तक वाचल्यावर श्री. करंबेळकर फार भारावून गेले ते म्हणतात, ''वीस वर्षापूर्वी मी प्रथम गिरनार दर्शन घेतले तेव्हा थक्क झालो आणि पुन्हा थक्क झालो ते लेखकाची एक स्मरणिका वाचली तेव्हा. त्यांच्या चित्तथरारक अनुभवांची झलक पाहिली तेव्हा पुन्हा एकदा थरारलो, वाटले, त्यांना भेटावयास हवे... नमस्कार करावयास

समाजविमुखता हा धर्माचा प्रधान गुण आहे.

हवा... देवावर श्रद्धा सर्वांचीच असते, पण प्रसंग उभा राहिला की ती श्रद्धा डळमळते; परंतु त्यांतूनही जी टिकून राहते ती निष्ठा असते. कारण ती कृतिशील असते. पराकोटीच्या कठीण कसोट्यांमधून ती तावून सुलाखून निघालेली असते. तेथे विकल्पाला जागाच नसते. त्यामुळे त्यात जी असते ती फक्त भक्ती प्रेमाची धुंद नशा! श्री. प्रमोद केणे अशा पराकोटीच्या अनेक परीक्षांतून पार पडले आहेत, म्हणून तर श्री दत्तप्रभू सतत त्यांच्या मागे-पुढे उभे राहिले आणि त्यांना अनेक प्रसंगातून त्यांनी (दत्तप्रभूंनी) सावरले आहे, सांभाळले आहे. आता तर श्री. केणे दत्तमय झाले असून केवळ दत्तप्रभूंचेच झाले आहेत.''

### कठोर साधना-तपश्चर्या

या पुस्तकातील त्यातला अनुभव कथनातून त्यांची श्रीदत्तप्रभूंवरील निष्ठा, भक्तिभाव व जिव्हाळा निर्व्याजपणे प्रकट झालाच आहे. 'यस्यानुग्रहं इच्छामि तस्य वित्तं हराम्यहम्', या श्रीमद भागवतातील वचनानुसार श्रीप्रभूंनी त्यांच्या कठोर परीक्षा घेतल्या. पराकोटीची निंदानालस्ती, चिंता, काळजी श्री. केणी यांना झेलावी लागली. सर्व बाजूंनी त्यांचे आधार तोडले गेले, दोर कापले गेले तरी ते तसूभरही ढळले नाहीत की त्यांची दत्तभक्तीही डागाळली नाही. त्यांचे अनुभव वाचत असता अनेकदा डोळे भरून यायचे; मग वाचणेही अशक्य झाले की पुस्तक मिटवून ठेवण्याखेरीज गत्यंतर नसायचे. अशावेळी डोळे मिटून निस्तब्ध बसून रहावे लागे. त्यावेळी वाटायचे, 'कसे सोसले असेल त्यांनी हे! पण म्हणतात ना, चणे खावे लोखंडाचे तरीच लाभे सद्गुरु केणे। मग होई सफल जिणे। आत्मप्रतीतीचे तात्काळ' किती खरे आहे हो! हे सदगुरु केणे (म्हणजे सोने) त्यांनी कष्टाने मिळविले आहे. म्हणून तर त्यांचे 'केणे' हे आडनाव सार्थ झाले ना! यामागे त्यांची कठोर साधना-तपश्चर्या आहे हे कदापि विसरू नये. अशा पुस्तकाच्या शेकडो आवृत्त्या निघोत अनेकांना त्यापासून स्फूर्ती मिळो; आपल्या स्वार्थासाठी मात्र त्यांची आध्यात्मिक शक्ती खर्ची पडू नये, याची काळजी प्रत्येकाने घ्यावी. दुबळेपणा सोडून स्वतः समर्थ कसे बनावे हे सांगणारे हे पुस्तक आहे. श्रीदत्तप्रभूंचे आपणही लाडके कसे व्हावे हे दाखवणारा हा 'भक्तमार्ग प्रदीपर्च आहे. श्री. केणे यांना शुभेच्छा.

### गिरनार व गिरनार परिसर यांची माहिती

गिरनार हे श्रीदत्त महाराजांचे अक्षय निवासस्थान आहे. कित्येक संतांना याच ठिकाणी दत्तप्रभूंनी साक्षात दर्शन दिले आहे. अनादीकालापासून कित्येक सिद्धयोगी गिरनारच्या गुंफांमध्ये साधना करत होते, अजूनही आहेत. बाबा किनाराम अघोरी, वासुदेवानंद टेंबे स्वामी महाराज, रघुनाथ निरंजन, नारायण महाराज यांच्यासारख्या संतांना इथे महाराजांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ झाला आहे. गिरनार ही महाराजांची तपोभूमी आहे. याच शिखरावर दत्तमहाराजांनी बारा हजार वर्षे तपश्चर्या केली. त्यांच्या पायांचे गुरुशिखरावर उमटलेले ठसे, म्हणजेच त्यांचे चरण कमल, दत्तभक्तांचे प्रेरणास्त्रोत बनले आहे. ईश्वराचे इतर अवतार हे त्यांच्या कार्यापुरते मर्यादित होते. परंतु दत्तमहाराजांचा अवतार हा चिरंजीवी असून ते सदैव कार्यरत आहेत. ते परमगुरू असून सर्वांना आजही मार्गदर्शन करीत आहेत. ही माहिती 'गिरनार आणि गिरनार परिसर' आणि 'मी' पणाचे व्हावे विसर्जन' या प्रकरणातून दिलेली आहे. गिरनार स्थल दर्शनाचा नकाशा पृ.७ वर आहे. पृ.१५० वर मुंबईहून गिरनारला जाण्याचा मार्ग दाखविला आहे. सुरुवातीस श्री ज्ञानेश्वर महाराजांनी केलेले, सद्गुरू स्तवन आहे. शिवाय पृ.१५१ वर त्यांचे पसायदान दिलेले आहे. श्री दत्तगुरु, श्री स्वामी समर्थ, श्री साईबाबा, श्री शंकर महाराज इ. संतांची रंगीत छायाचित्रे व गिरनार पर्वत, गिरनारचे गुरुशिखर इ. स्थनांची रंगीत छायाचित्रे असल्यामुळे पुस्तक मोठे देखणे झाले आहे. श्री. केणे यांच्या १०८ यात्रा पूर्ण झाल्यावर चारपाच दिवसांनी १५ व १६ जून २०१२ रोजी दत्त याग सोहळा संपन्न झाला व

महादत्त याग सोहळा १५ ते १७ डिसेंबर २०१२ रोजी संपन्न झाला. त्यांचे भक्ती प्रधान वर्णन अनुक्रमे पृ. १३९ ते १४३ व पृ. १४४ ते १४६ या पानांवर आले आहे.

असे हे अपूर्व पुस्तक आहे. प्रत्येक श्रद्धावान व्यक्तीने व साधकांनी आणि दत्त संप्रदायातील मंडळींनी ते वाचावेच, पण सर्वसाधारण व्यक्तींनीही ते अवश्य वाचावे (पर्यटन व भटकंतीची आवड असणाऱ्यांनाही ते आवडेल असे वाटते) ही विनंती. श्रीदत्तगुरुंच्या कृपेने श्री. केणे यांनी मोलाचे काम केले व प्रकाशक जय गिरनारी दत्तमंडळ (पत्ता सुरुवातीस दिला आहे) यांनी त्यांना सहाय्य दिले त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद!

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
सी–५, अमर कल्पतरू को. हौ. सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर, डोंबिवली – ४२१२०२
दूरध्वनी : ०२५१–२४८६९६७

●●●

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

उदा. देकार्त, प्लेटो, उत्क्रांतिवादाचा उद्‌गाता चार्ल्स डार्विन, मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉईड, सिल्व्हा माईंड कंट्रोलचा सिद्धांत मांडणारे रॉबर्ट सिल्व्हा, हृदयरोगाचा अभ्यास तत्त्वज्ञान स्वरूपात मांडणारे डीन ऑर्निश, समाजशास्त्रज्ञ ऑलवीन टॉफ्लर, न्यूटन व आईनस्टाईनसारख्यांचे उत्तराधिकारी मानले जाणारे स्टीफन हॉकींग व अनेक शास्त्रज्ञ अशी अनेक नावे आणि भारतीय शास्त्रज्ञांची परंपरा ही सर्व नावे लक्षात घेता, त्यांच्या विचारांची आणि ग्रंथांची सत्ता आजही जगावर राज्य करते हे दिसते. या विचारांमध्ये संपूर्ण मानव जीवनाला दिशान्वित व कार्यान्वित करण्याची शक्ती व त्यांच्या क्षमतांचे योगदान महत्त्वाचे आहे. शास्त्रीय, समाजशास्त्रीय इ. साहित्याप्रमाणेच ललित साहित्यातील नोबेल पुरस्कार प्राप्त करणाऱ्या वा त्या तोडीच्या जीवनाची खऱ्या अर्थाने जाण असणाऱ्या, साहित्यिकांच्या योगदानाचे ही असाधारण महत्त्व आहे. अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या Cold Man and the Sea या कादंबरीप्रमाणेच, ॲनिमल फार्म (जॉर्ज ऑर्वेल) रीचर्ड बासपासून अनेक साहित्यिक आठवून पाहा; त्यांनी मानवी जीवनाला दिलेला आकार हा ग्रंथांच्या सत्तेचे प्रतीक आहे. यांत आपल्याकडील बंगाली साहित्यकार शरश्चंद्र चटर्जी, गुजराती साहित्यकार शरद जोशी, मराठीतील जी. ए. कुलकर्णी दक्षिणेतील शिवरामपंत कारंथ, व्ही. के. गोकाक अशी ही यादी ही खूप वाढवता येईल.

विविध प्रकारच्या सत्ता एकाचवेळी मानवी जीवनावर अधिराज्य गाजवत असतात. यांतील प्रत्येक सत्ता प्रकारावर स्वतंत्र असे हजारो ग्रंथ आहेत. या विषयावर न थकता खूप विचारांचे मंथन करता येईल. परंतु समुद्र क्षितिजापाशी थांबतो असे आपण मानतो, तशा अनेक विषयांपैकी सत्ता हा विषय अथांग आहे.

तरीही त्रिकालाबाधित असे एक सत्य आपले अस्तित्व टिकवून आहे. ते म्हणजे पृथ्वीसह सर्व विश्वावरील 'सत्ता' गाजवणारा काळ हे होय. या सत्तेपुढे सर्वकाही शून्य असते. काळाची सत्ता ही सर्वव्यापी आणि एकमेव एक आहे. तिचे प्रकार संभवत नाहीत. 'बदल' हे या सत्तेचे वैशिष्ट आहे. काल होते ते आज नाही व आज आहे ते उद्या नाही या पार्श्वभूमीवर, मागील अंकातील भगवान श्रीकृष्णांचा गीतेतील संदेश आठवा आणि 'कालाय तस्मै नमः' हे का मान्य करावे लागते याचा विचार करा.

समर्थ श्री रामदास स्वामी म्हणतात, 'घडी ने घडी काळ आयुष्य नेतो' त्याचाच अर्थ ही प्रबळ 'अशी काळाची सत्ता' ही सर्व सत्तांत श्रेष्ठ आहे.

**–प्रा. मोहन पाठक**

(टीप/नोंद : मार्चचे संपादकीय खूप आवडल्याचे अनेकांनी भ्रमणध्वनीवर सांगितले. यासर्व वाचकांचे आभार! अर्थातच प्रत्येक संपादकीय आवडल्याचे भ्रमणध्वनी / दूरध्वनीवरून अनेकजण कळवतात. अशा सर्व वाचकांचे मनःपूर्वक धन्यवाद! – संपादक)

●●●

मौन जिभेला अनेक चुका करण्यापासून वाचवते.

**पुस्तक परिचय**

# सकळ जन

*जोडलेली माणसे इतर माणसांशी जोडू पाहणारे वाचनीय पुस्तक 'सकळ जन' या पुस्तकाचा परिचय – संपादक*

'सकळ जन' हे संपदा वागळे यांचे डॉ. अनंत देशमुख यांचे हस्ते नुकतेच ठाण्याच्या अत्रे कट्ट्यावर थाटामाटात प्रकाशित झालेले पहिलेच पुस्तक. (प्रकाशक–शारदा प्रकाशन, ठाणे मूल्य १६० रु.) या पुस्तकाला त्यांचीच प्रस्तावनाही लाभलेली आहे. लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळच्या पुरवठ्यांमधून गेले तपभर त्या व्यक्तिचित्रात्मक लेखन करीत आहेत. लेखनाला त्यांची तशी उशिराच सुरुवात झालेली आहे. मन मोकळ्या, साध्या सरळ स्वभावामुळे त्यांनी अनेक माणसे जोडली होती, म्हणजे अनुभवाची शिदोरी आयुष्याच्या पूर्वार्धात साठवलेली होती, माहिती गोळा झालेली होती. पण लेखनाची सुरुवात झाली ती स्वेच्छा निवृत्ती नंतर म्हणजे पन्नाशीच्या आसपास. स्टेट बँकेतून निवृत्ती घेतल्यानंतर यापुढे पसरलेल्या मोकळ्या वेळेचे काय करायचे! हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे 'आ' वासून उभा राहिला. काही तरी लिहून बघावं का? त्यांच्या मनात आलं नि ते त्यांनी कृतीत उतरवलं. पहिलाच प्रयत्न सफल झाला. लोकसत्तेतून ते लिखाण प्रसिद्ध झालं; म्हणजे आपण लिहू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. मग धडाधड लेख लिहायला सुरुवात झाली. लेखनाचं तंत्र जमलं, माहिती होतीच तंत्र पण जमलं, म्हणजे आजचं माहिती आणि तंत्रज्ञान अवगत झालं. मग लेख प्रसिद्ध होत गेले नि संपदा वागळे नाव सर्व परिचित झालं.

याच काळात यांच्या वैयक्तिक जीवनात मुलांची लग्ने झाली. नोकरी निमित्ताने ती दूर गेली. जोडीदार ही दिगंताच्या प्रवासाला दूर निघून गेला. अशा वेळी आलेलं एकाकीपण, उदासीनता, उद्विग्नता मनाला अंतर्मुख करते, विफल बनवते. पण त्या त्यांच्या जन संपर्कामुळे त्यातून सहज बाहेर पडल्या. वाचन, वत्कृत्व, पाठांतर, प्रसन्न व्यक्तिमत्व, लोकाभिमुखता यांमुळे त्यांनी ठाण्यात 'आचार्य अत्रे कट्टा' उभारला. तेथेही त्यांचे सांस्कृतिक कार्य जोमात सुरू आहे. अनेकांची साथ संगत त्यांना या कार्यात लाभली आहे.

'सकळ जन' ह्या पुस्तकात खरोखरच अनेक जणांचे व्यक्तिचित्रण आहे. यात काही स्वकीयांची व्यक्तिचित्रणे आहेत, काही प्रतिष्ठितांची आहेत, काही अगदी तुमच्या आमच्यातील सामान्यजनांची आहेत, तर काही खास विशेष व्यक्तिमत्वे आहेत. 'मै हूँ ना!' मध्ये त्या स्टेट बँकेतील व नंतर अत्रे कट्ट्यावरील सहाध्यायींचे व्यक्तिचित्रण करतात. 'अफलातून' मधे ॲड. शरद भाटे ह्या जरा विक्षिप्त, स्पष्ट वक्ता, रोखठोक बोलणारा तरी व्यवसायाबरोबरच आपली सामाजिक बांधिलकी जाणून समाजसेवेच व्रत तितक्याच आत्मीयतेनं निभावणाऱ्या एका अवलियाचे स्वभाव चित्रण अगदी ह. मो. मराठ्यांच्या भाषेत सांगायचं, तर त्या कॅमेरा शैलीत करतात.

'कृतार्थ सहजीवनाचे अर्धशतक' मध्ये 'सुंदर माझं घर' ह्या दूरदर्शन फेम मालिकेतल्या मोहिनी निमकरांचे, त्यांच्या बरोबरचे सहजीवन चित्रकाराच्या कुंचल्याच्या फटकाऱ्यासारखे रंगून रंगवितात. वार्धक्यातही पर्यटनाची आवड असणाऱ्या व ती जोपासणाऱ्या प्रमिलाताई आपटे यांचा परिचय 'मन उधाण वाऱ्याचे' मधून करून देतात. 'अत्रे कट्ट्याचा नारायण' म्हणून अविनाश कासार यांची

---

मार्गातील धोंडा दुबळ्यांना मोठा अडसर वाटतो, तर सबळांना सोपीशी पायरी.

तर संपर्कात, सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकावर प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या सुलभा अरोसकर यांची ओळख त्या 'लोभस' मधे करून देतात.

'मी माझे आणि मला' यातच न गुरफटता समाजहितासाठी आपले योगदान देणारी मग ती शिक्षित उच्च विद्या विभूषित, सामान्य, असामान्य अशिक्षित, तळागाळातील माणसे का असेनात, त्यांच्यासाठी निरलसपणे झोकून देऊन काम करणाऱ्या व्यक्तीची चित्रणे आपल्याला वत्सलाबाई कुलकर्णी, अप्पा खांबेटे, दादा दांडेकर, सुमित्रबाई गुर्जर यांच्या विषयीच्या लेखातून परिचित होतात.

'आणि आमच्या घराचं नशीब बदललं' हा या संग्रहातील शेवटचा लेख 'वास्तुरंग' लोकसत्ता पुरवणीत आला होता. तोही या पुस्तकात समाविष्ट केला आहे. कारण ते गावाकडचं घर माझ्या मनात एखाद्या नातेसंबंधातील व्यक्तीप्रमाणे ठाण मांडून बसलं होतं म्हणून या 'सकळ जन' पुस्तकात त्याचा आवर्जून अंतर्भाव केला आहे असं लेखिका मनोगतात सांगते. कधी जवळच्याच आसपास वावरणाऱ्या माणसांवर, तर कधी हिमालयाची उंची गाठणाऱ्या व्यक्तींवर, तर कधी निसर्गावरही लेखन केलं. आजवर त्यांचे जवळपास २५० लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

स्वेच्छानिवृत्तीनंतर 'स्वान्त सुखाय' लिहीत गेले रिकामा वेळ भरून काढण्यासाठी; नंतर लिहीतच गेले असे त्या सांगतात. आपल्याच आसपासची हिरे माणकं त्यांची शोधक नजर व संवेदनाशील मन शोधत असते आणि त्यांची लेखणी मग त्यांना मूर्त रूप देऊन लोकांपुढे सादर करते. अशीच एका कर्तृत्वाची शिखरं पादाक्रान्त करणाऱ्या समाजाविषयी आपली बांधिलकी जाणून समाजसेवेचं असिधारा प्रत घेणाऱ्या विद्या शहा यांची ओळख त्यांनी 'विद्यादान' या लेखाद्वारे अरिअरिस्ट मी या सदरातून अतिशय हृद्यपणे करून दिलीय. ही त्यांची साहित्याद्वारे समाजसेवाच आहे. ती अशीच घडत राहो. यांपुढील पुस्तकांची बेगमीही त्यांनी आधीच केलेली आहे. लवकरच त्यांची आणखीही पुस्तके आपल्या हातात पडतील.

वाचा वाचा सकळ जन। होईल रंजन, उद्‌बोधन।
अंगी बाणवाल प्रेरित होऊन। 'सकळ जन' वाचताच।।

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी – २५४१०१४०
भ्रमणध्वनी – ९३२४०४४७६४

●●●

### *वाचा आणि विचार करा*

केवळ आपुल्या स्वार्थासाठी कलह नसावा घरामधे।
आपुलकीच्या नात्या मधुनी स्नेह जपावा मनामधे।।धृ।।

येणाऱ्याला पाणी द्यावे मुखात वाणी गोड हवी।
जाणाऱ्याच्या मनात फिरूनी येण्याविषयी ओढ हवी।
ऐसा प्रेमळ माणुसकीचा झरा वहावा मनामधे।।१।।

भांड्याला लागतेच भांडे विसरूनी जावे क्षणामधे।
परस्परांना समजून घ्यावे आढी नसावी मनामधे।
रूसवे फुगवे नको फुकाचे मोद रहावा मनामधे।।२।।

नित्य काळजी घरात घ्यावी वय झालेल्या पानांची।
ज्याची त्याला द्यावी जागा वयाप्रमाणे मानाची।
एकमताने निर्णय घ्यावा नको दुरावा मनामधे।।३।।

लळा जिव्हाळा आत असावा नको उमाळा वरकरणी।
नको घराला गर्व धनाचा लीन रहावे प्रभुचरणी।
दिवसा राती परमेशाचा वास असावा घरामधे।।४।।

ज्या व्यक्तीवर प्रेम केले जाते तिच्याशी स्पर्धा केली जात नाही.

# अन्न हे पूर्ण ब्रह्म

*अन्नाला जीवनात असणारे महत्त्व अतुलनीय असून भोजनापूर्वीच्या प्रार्थनेचे महत्त्व या लेखात आले आहे - संपादक*

अन्न ही मानवाची, किंबहुना सर्वच जीवांची मूलभूत गरज आहे. अन्नामुळे सर्व जीवांचे भरण पोषण होऊन रोजची कामे करण्यास त्यांना शारीरिक व मानसिक ऊर्जा मिळते. अन्नाची सकसता, पौष्टिकता, गुणधर्म व एकूणच मानवी आरोग्याशी संबंध या सर्व विषयांवर आधुनिक काळात अगदी जगभर खूपच संशोधन झालेले आहे व होत आहे.

अर्थातच, कोणते अन्न खावे व कोणते खाऊ नये यांवर आधुनिक शास्त्र भर देताना दिसते. परंतु अन्न कशाप्रकारे खावे, नेमक्या कोणत्या मनोभूमिकेमधून अन्नसेवन करावे याबाबत मात्र आधुनिक शास्त्रापेक्षा सर्वच प्राचीन धर्मांमध्ये अधिक सखोल विचार केलेला आढळतो. अन्न ग्रहणापूर्वी करावयाच्या प्रार्थनांमधून आपल्याला ह्या सखोल विचाराची झलक पहावयास मिळते.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे जगातील प्रत्येक धर्माने (हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, ज्यू, जैन, बौद्ध इ.) अन्न सेवनाच्या वेळेस करावयाच्या प्रार्थनेला व त्याविषयीच्या दंडकांना (Dos & Don'ts) अनन्यसाधारण महत्त्व दिलेले दिसून येते. मुळातच, अन्नसेवनाकडे 'उदरभरण' किंवा निव्वळ 'शारीरिक कृती' (Physical Act) म्हणून न पहाता, एक 'आध्यात्मिक कृती' (Spiritual Act) म्हणून हे धर्म पहातात. त्यामुळेच हिंदू धर्मातील असंख्य उपवास, व्रत, वैकल्ये, इस्लाममधील रोजे, जैनांमधील पर्युषण, ख्रिश्चनांमधील इस्टर उपवास या सर्व उपचारांना एक वेगळे परिमाण प्राप्त होते.

प्रस्तुत लेखामध्ये आपण प्रामुख्याने हिंदू धर्मातील अन्न सेवना पूर्वीच्या प्रार्थना, अन्न ग्रहणाविषयीच्या धारणा व त्यांचा एकूणच तत्त्वज्ञानाशी व जीवनशैलीशी असलेला संबंध याविषयी जाणून घेण्याचा एक ओझरता प्रयत्न करणार आहोत.

**काही महत्त्वाच्या प्रार्थना**

हिंदू विचारधारा समजून घेण्यासाठी आपण काही प्रार्थना थोडक्यात लक्षात घेऊ.

ब्रह्मार्पण ब्रह्म हविर्ब्रह्म्याग्नो ब्रह्माणा हुतम् ।
ब्रह्मेव तेन गन्तव्यं ब्रह्म कर्म समाधिना ।।४.२४।।

– भगवद्गीता

**अर्थ**

या संपूर्ण विश्वामध्ये केवळ एकच अस्तित्व भरून राहिले आहे व ते म्हणजे 'ब्रह्म' (परमेश्वर) होय. ब्रह्म तत्त्व सर्वत्र, म्हणजेच माझ्या अंतर्यामी व बाहेर वास करत आहे. माझ्यातील अंतर्यामी परम ब्रह्मास मी अन्नरूपी हविर्भाग किंवा यज्ञाहुती देत आहे व ह्या हविर्भागामुळे ब्रह्म समाधान पावत आहे. अशा या अन्नरूपी यज्ञामुळे माझ्यातील 'मी'पणाची, देह जाणीव धारणा कमी होऊन मी ब्रह्मरूप आहे. ही धारणा वृद्धिंगत होत आहे.

अहं वैश्वानरोभूत्वा प्राणितां देहमाश्रितः ।
प्राणापान समायुक्तः पंचायन्न चतुर्विधम ।।(१४.१५)

– भगवद्गीता

**अर्थ**

मी (म्हणजे परम ब्रह्म तत्त्व) सर्व जीवांच्या देहामध्ये

समाजरंजनी अग्नी (digestive juice) होवून चार प्रकारचे अन्न (भक्ष्य, चोष्य, लेहय व पेय) प्राशन करतो.

वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे।
सहज हवन होते नाम घेता फुकाचे।।
जीवन करी जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म।
उदभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म।।

**अर्थ**

अन्न प्राशन म्हणजे केवळ शारीरिक कृती नसून तो एक प्रकारचा यज्ञ आहे. याची करून दिलेली आठवण.

**आता एक अप्रतिम शांतिमंत्राकडे वळू.**

ॐ सहनाववतु। सह नौ भुनक्तु। सहवीर्यं करवावहै।
तेजस्विनावधीत मस्तु। मा विद्दिषावहै।
ॐ शांतिः शांति ः शांतिः।

विशेषतः गुरुशिष्यांनी अथवा सहहेतूने एकत्र आलेल्या मंडळींनी भोजन पूर्व करावयाच्या या प्रार्थनेचा अर्थ आहे.

आम्ही (दोघांनी) एकत्र रहावे, एकत्र अन्न सेवन करावे, आमचे अध्ययन/अनुभव, आम्हांला तेजस्वी करणारे असावेत. आमच्याकडून एकमेकांचा द्वेष न घडो. आम्हांला शांती प्राप्त होवो, सर्वांना शांती प्राप्त होवो, सर्वत्र शांती असो.

**प्रार्थनांमधून प्रकटणारी विचारधारा**

वरील श्लोकांमधून प्रकट होणारे तत्त्वज्ञान अथवा विचारधारा पुढीलप्रमाणे ...

१. सर्व चराचरांमध्ये एकच ब्रह्म तत्त्व अथवा ईश्वर भरून राहिला आहे.
२. हाच ईश्वर सर्व जीवांच्या अंतरंगात वास करतो आहे.
३. अन्न सेवन हे पोट भरणे नसून तो एक पवित्र यज्ञ आहे.
४. यातून मला जी ऊर्जा मिळणार आहे, तिचा वापर मला परमेश्वराने मांडलेल्या या विश्वरूपी यज्ञामध्ये करता येऊ दे. थोडक्यात, मला चांगले काम करता येऊ दे.
५. द्वेष, हव्यास अशा शूद्र भावनांपासून आमचे रक्षण होऊ दे.
६. अन्न देणारा व अन्न ग्रहण करणारा, हे दोघेही ईश्वर स्वरूप आहेत.

वरील सर्वच विचार शलाकांमधून प्रेरणा घेऊन स्वामी विवेकानंदांनी उच्चरवाने सर्व भारतीयांना संदेश दिला की, जोपर्यंत भारतामध्ये दरिद्रीनारायणाला अन्न मिळत नाही, अगदी एक मनुष्य जरी उपाशी पोटी अन्न शोधत असेल तरी तुम्ही देवाला दाखवत असलेला नैवेद्य खोटा आहे. कारण त्या उपाशी माणसाच्या रूपाने साक्षात ईश्वरच उपाशी राहात आहे. असो...

**इतर धर्मांतील प्रार्थनांचा संदर्भ**

जाता जाता इथे इस्लाम व ख्रिश्चन धर्मातील प्रार्थनांचा संदर्भ जरुर द्यावासा वाटतो. इस्लाम धर्मात प्रार्थनेला 'दुवा' (Grace) असे संबोधले जाते. ती छोटीशी प्रार्थना अशी

बिस्मिल्लाह वा बरकतील्लाह।

''ईश्वराचे नाव घेऊन व ईश्वराच्या अपरिमित कृपेने आम्ही हे अन्नसेवन करत आहोत.''

तसेच ख्रिश्चन धर्मांमध्ये येणारी Thanks Giving ची प्रार्थना अशी

God is great & God is good
We thank him for our food;
By his hand we all are fed;
Give us Lord our daily bread

**हिंदू व वैदिक धर्मातील गृहस्थाश्रमींचे अन्नविषय नेमनियम**

वर्णाश्रम धर्मानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण होत तर ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे

४ टप्पे अथवा मानवी जीवन प्रवासातील ४ Stations होत. यापैकी विश्वधारणेचे काम (sustainence) गृहस्थ धर्मावर सोपविण्यात आले आहे. गृहस्थाने व गृहिणीने कसे व कधी अन्न सेवन करावे याचे वर्णन काहीसे पुढीलप्रमाणे... उत्तम पद्धतीने अन्न शिजवून सर्व अन्न तयार झाल्यावर प्रथम पतीपत्नींनी परमेश्वरास नैवेद्य दाखवावा. नंतर अनुक्रमे तुळस, गाय, कावळा यांना त्यांचा वाटा द्यावा. मग घरातील लहानथोरांना यजमानांनी सपत्नीक प्रेमाने अन्न वाढावे. यानंतर अभ्यागत (प्रवासी) व दीनदुबळ्यांना प्रेमाचे कर्तव्य समजून अन्नदान करावे. अशाप्रकारे बाह्यरूप ब्रह्माला हविर्भाग दिल्यानंतर जे काही उरेल, ते पतीपत्नींनी एकत्रितपणे खावे.

या सर्वांवरून आपल्या सहजच लक्षात येते ती गोष्ट अशी की वृक्ष, पशुपक्षी, पाहुणा, कर्मचारी वगैरे ज्या ज्या सृष्टी घटकांवर गृहस्थाश्रम (त्या काळात कृषिसंस्था) टिकून असतो त्या सर्व घटकांच्या कल्याणाची गृहस्थाने चिंता वहावी, त्यांच्या अन्नाची म्हणजेच भरणपोषणाची व्यवस्था करावी.

तुळशीला नैवेद्य दाखवावा, म्हणजे वृक्षांचे पोषण व संवर्धन करावे; कारण खऱ्या अर्थाने तेच या सृष्टीचे अन्नदाते आहेत. गाईला नैवेद्य, म्हणजे कृषी संस्कृतीचा कणा असलेल्या प्राणिमात्रांचे संरक्षण. कावळा हा पक्षी जगताचा प्रतिनिधी, त्यातही तो सृष्टीचा सफाई कामगार त्याला सन्मानपूर्वक त्याचा वाटा द्यावा. (कावळ्याला पराशास्त्रामध्ये विशेष स्थान आहे पण या लेखाचा तो विषय नाही). म्हणजे, संपूर्ण अन्नसाखळीचे संवर्धन करण्याचा संदेश इथे दिलेला दिसतो. समष्टींच्या भरण पोषणाचा विचार हिंदू धर्मपरंपरेने केला आहे व मानवाचे कल्याण Well being संपूर्ण सृष्टीवर निरंतन अवलंबून आहे, हा विचार कुठेतरी अधोरेखित केलेला दिसतो. त्यामुळे, मुळातच अन्नसेवन ही वैयक्तिक माझ्यापुरती बाब न रहाता (उदरभरण नोहे) ती एक सार्वत्रिक समष्टिप्रेरक बाब होऊन जाते. ज्यू धर्मामध्ये प्रत्येक घासाला ईश्वराचे व त्याने निर्माण केलेल्या सृष्टीचे स्मरण ठेवा, असे आवर्जून सांगितले जाते.

दुसऱ्या शब्दांत हा मुद्दा मांडायचा झाल्यास, हिंदू संस्कृती अन्नसेवन ह्या कृतीस, कर्तव्याचे परिणाम देते तसेच हे कर्तव्य शारीरीक मानसिक सामाजिक व आध्यात्मिक अशा सर्व पातळ्यांना सामावून घेते.

"Pick your lunch on your way" "Happy price menu" याच्यावर ते मोफत "gulp your sandwich & board the train" म्हणजेच काय जेवणावर वेळ घालवू नका वा कमीत कमी पैशात जेवा, असे संदेश पाहिले की आजी म्हणायची ते वाक्य आवर्जून आठवते अशा वागण्याने का अन्न अंगी लागते?...

काही वर्षांपूर्वी, मी अनुभवलेला एक प्रसंग इथे आवर्जून नमूद करावासा वाटतो. शेगाव या धार्मिक क्षेत्रामध्ये प्रसाद सेवनाचा योग आला. खुर्च्या टेबले मांडलेल्या या आधुनिक प्रसाद गृहात खूप मंडळींची येजा होती. कर्मधर्मसंयोगाने एक फकीरबाबा आमच्या पुढयात येऊन बसले. बाबा बुद्रेवरुन प्रचंड उग्र वाटत होते. मोठे, लाल डोळे, खगलेली कुडी, मळलेले कपडे, असा सगळा अवतार. त्यांना पाहून भीती ही एकच भावना मनात उमटत होती. क्षणाभर मला प्रसादासाठी दुसऱ्या टेबलावर जावे असे सुद्धा वाटले.

पण नंतर जे घडले ते केवळ अद्‌भुत होते. भाजी भाकरीचा प्रसाद टेबलावर येईपर्यंत फकीर स्वच्छ हात – पाय धुवून आले. हात जोडून डोळे मिटून प्रार्थना केली. प्रसादातल्या भाकऱ्यांपैकी एक भाकरी मांडवाभोवती फिरणाऱ्या एका कुत्र्याला अत्यंत प्रेमाने खाऊ घातली व उरलेली भाकरी हातावर घेऊन ते जेवू लागले. इतक्या तल्लीनतेने प्रत्येक घासासोबत ईश्वर स्मरण करत त्यांचे जेवण म्हणजे साक्षात यज्ञकर्माचा वस्तुपाठ होता. त्यांची

उग्र गंभीर मुद्रा विलक्षण मऊ प्रेमळ व शांत दिसत होती. जणू काही त्यांनी आतले परब्रहम जाणले होते. आज एवढ्या वर्षानंतर ही या विलक्षण अन्नयज्ञाने केलेले गारूड माझ्या मनावर तसेच आहे.

या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक शहरी लब्धप्रतिष्ठांच्या मेजवान्या पहाताना मनाला पीळ पडतो. Buffet च्या नावाखाली अन्नाचे मांडलेले प्रदर्शन, त्यातून अपरिहार्यपणे होत असलेली अन्नाची नासाडी, अन्नसेवन या पवित्र यज्ञकर्माला आपण प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनां पायी किती भ्रष्ट, निकृष्ट करुन टाकले आहे, या जाणिवेने मन व्यथित होते.

WHO (World Heath organisation) म्हणजे जागतिक आरोग्य संघटनाच्या मते आरोग्याच्या व्याख्येमध्ये आवर्जून सामाजिक जाणिवांचा विचार केला जातो. काय झाले आहे आज आपल्या जाणिवांना. एकीकडे अन्नाचा बाजार, अक्षम्य नासाडी तर दुसरीकडे कुपोषणातून होणाऱ्या बालमृत्यूंची समस्या उग्र रूप धारण करणारी समस्या. वसुधैव कुटुंबकमं हे मूल्य जपणारी आपली संस्कृती या सामाजिक अन्न विषमतेबाबत नेमका काय विचार करते?

**आधुनिक वैदयकशास्त्रामधील महत्त्वाचे मार्गदर्शक – जीवनशैली नियोजन**

पुन्हा वैयक्तिक आरोग्याकडे वळताना जवळजवळ सर्वच व्याधी आजारांवर, उपचार म्हणून औषधांबरोबर न दिले जाणारे एक महत्त्वाचे Prescription (मार्गदर्शक) म्हणजे "Life style Management अथवा आपल्या जीवनशैलीचे सुयोग्य नियोजन; ज्यामध्ये प्रामुख्याने आरोग्यविषयक महत्त्वाच्या सवयी, जेवणाच्या सवयी सकारात्मक विचार, रोजच्या ताणतणावांचे नियोजन, सभोवतालाशी केलेले समायोजन (ज्यात Boss पती/ पत्नी मुले, सहकारी, सहप्रवासी इ. सर्व गोष्टींचा समावेश होतो) असे अनेक घटक अभिप्रेत आहेत.

कदाचित, या सर्व गोष्टींचे महत्त्व समजून उमजून आपल्या पूर्वजांनी काय खावे? याबरोबरच कसे खावे? कोणते सकारात्मक विचार जेवताना आपल्या मनात असावेत, निसर्गातील अन्न साखळी आपले योगदान देत कशी वर्धिष्णू (वाढती नांदती) ठेवावी, या सर्व मुद्दयांचे चिंतन केलेले दिसते. या चिंतनाचेच प्रतिबिंब भोजनपूर्व प्रार्थनांमध्ये आपल्याला परिवर्तित झालेले दिसते.

**मीरेची दंतकथा**

जाता जाता उल्लेख करावासा वाटतो, संत मीराबाई विषयीच्या दंतकथेचा ... मीरेला दिला गेलेला विषाचा प्याला तिने हसत हसत पचवला (राणाने विष दिया मानो अमृत पिया, मीरा गोविंद गोपाल गाने लगी...) काय असेल याचे मर्म? मीरेची निःस्सिम हरीभक्ती व त्यातून आलेली प्रचंड सकारात्मकता, यांमुळे तिची पचनशक्ती पचनसंस्था अधिक चिवट तर नसेल झाली?

आधुनिक वैद्यकशास्त्राच्या मते मनोविकारांचा व पचन संस्थेचा (किंबहुना संपूर्ण आरोग्याचा) फार जवळचा, अगदी अन्योन्य संबंध आहे. बरेचसे आजार मनोकायिक ह्या गटात मोडतात. हे जर का खरे असेल, तर विलक्षण श्रद्धापूर्ण अंतःकरणाने व सकारात्मकतेमुळे पचनसंस्था अधिक शक्तिसंपन्न होऊ शकते हे देखील आपल्याला मान्य करावे लागेल ना? (अध्यात्मिकता व आरोग्य या विषयांचे संशोधन अत्यल्प आहे व त्यास खूप मर्यादा आहेत, याची जाणीव आहेच.)

**मुक्त संवाद**

महात्मा गांधींनी संस्कृतीची एक फार सुंदर व्याख्या सांगितली आहे. गांधीजींच्या मते, एखाद्या व्यक्तीच्या छोट्यातल्या छोट्या, साध्यातल्या साध्या कृतीमधून आविष्कृत होते ती संस्कृती. ह्या वचनाचा पडताळा भोजन संस्कृतीच्या बाबतीत घ्यायचा झाला तर?...

---

जग हा एक आरसा आहे...त्याकडे रागाने पाहाल, तर रागच दिसेल, प्रेमाने पाहाल, तर प्रेम.

आपण सुशिक्षित आहोत. उच्च विद्याविभूषितही आहोत. पण आपण अन्न सेवनासारख्या दिवसातून किमान ४-६ वेळा करत असलेल्या (लहानशा) कृतीबाबत सजग आहोत का? सुसंस्कृत आहोत का? (रडणाऱ्या सासू सुनेच्या मालिकेशी एकरूप होत आपण भान विसरून अन्न गिळतो का?)

आपण करत असलेल्या यज्ञकर्माची आपल्याला जाणीव आहे का? विचार करण्यासारखे प्रश्न आहेत ना? मग ह्या चिंतनाची सांगता सुद्धा एका छानशा प्रार्थनेतून करु.

''आ नो भद्र क्रतव्ये यान्तु विश्वतः ।।'' ऋग्वेद

**अर्थ**

''विश्वाच्या सर्व दिशांमधून भद्र, तेजस्वी विचार आमच्या पर्यंत पोहोचोत.'' (...व आमची वर्तणूक त्याच्या प्रकाशात उजळून निघो.)

**प्रा. सुचित्रा आ. नाईक**
समुपदेशक
जोशी-बेडेकर महाविद्यालय
ठाणे - ४००६०१

●●●

## *ऐन उन्हाळ्यात ठाण्यात संपन्न झालेला 'मेघदूत' महोत्सव !*

कै. मालतीबाई नवाथे ट्रस्ट (सद्धर्म प्रकाशन) ला ५० वर्षे पुरी झाल्याच्या निमित्ताने आणि ठाणे भारत सहकारी बँकेच्या भरघोस आर्थिक सहाय्याच्या आधारे ठाण्याचे सांस्कृतिक केंद्र म्हणून लोकप्रिय असलेल्या सहयोग मंदिरात दि. १८ ते २१ मार्च या सलग चार दिवस एक अत्यंत संस्मरणीय असा वाग्यज्ञ साजरा झाला. या चारही दिवस दररोज वाढत्या संख्येने आणि शिस्तबद्ध पद्धतीने उपस्थित असलेल्या 'जे जे उत्तम, उदात्त, उन्नत' ऐकण्याची ओढ असलेल्या ठाणेकर रसिक श्रोतृवृंदाची अवस्था आजही हृष्याऽमिच पुनःपुनः ('आठवुनि मनीं फार हर्षतो हर्षतोचि मी'- विनोबाजी) अशी होऊन गेली आहे.

संस्कृतमध्ये अनेक महाकवींनी असंख्य महाकाव्ये रचली आहेत, परंतु त्यात महाकवि कालिदास विरचित 'मेघदूत' हे खंडकाव्य रसिक वाचकांच्या हृदयात 'सर्वेषां अविरोधेन' विराजमान झाले आहे यात शंका नाही. या मूळ संस्कृत 'मेघदूता' ची अडतीस कवींनी आपापल्या परींनी विविध वृत्तांत काव्यमय भाषांतरे केलेली आहेत.

कै. मालतीबाई नवाथे ट्रस्ट ने 'मेघदूता'च्या या आस्वादक रसग्रहणाच्या कार्यक्रमासाठी ठाण्याच्या अत्यंत लोकप्रिय अशा निवेदिका सौ. धनश्री लेले यांची या कार्यक्रमासाठी अतिशय सुयोग्य आणि वादातील निवड केल्याबद्दल त्यांना दाद द्यावी तेवढी थोडीच आहे आणि सौ. धनश्री लेले यांनीही त्यांच्या या निर्णयाला पुरेपूर न्याय दिला, इतका, की प्रेक्षक श्रोते या कार्यक्रमाची पुढील अनेक वर्षे आठवण काढतच राहतील.

'मंदाक्रांता' या अत्यंत सुमधुर आणि लयबद्ध वृत्तात सुबद्ध असलेल्या 'मेघदूत'च्या ११६ श्लोकांचे सलग चार दिवस दररोज दोन तास आपल्या अमोघ, अस्खलित आणि प्रासादिक शुद्ध वाणीने सहज, सोप्या शैलीत आस्वादक रसग्रहण करणाऱ्या सौ. धनश्री लेले यांनी, त्यांच्या निरूपणा सोबत चालणाऱ्या चित्रशृंखलेच्या (स्लाईड शो) मदतीने प्रेक्षक श्रोत्यांना एकेक श्लोकांच्या एकेक शब्दातले प्रकट आणि सुप्त अर्थसौंदर्य अशा काही संवादक शैलीत उलगडून दाखवले की या कार्यक्रमानंतर सौ. धनश्री लेले या आता ठाणेकर रसिकांच्या हृदयात चिरंतन स्वरुपात विराजमान होऊन बसल्या आहेत, आणि आतां यापुढे त्या केवळ एक 'निवेदिका' म्हणून ओळखल्या न जातां एक विदुषी वक्त्या म्हणूनच गणल्या जातील यांत जराही शंका नाही.

**- सुभाष जोशी, ठाणे**

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ४**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत- संपादक*

**दिवस १० वा : मुक्काम पाटी**

**बावनगजा-अंजराडा-ओसाडा-बुधी-पाटी (१५ कि.मी.)**

सकाळपासून आकाशाचे निळेपण वेगळेपणाने उठून दिसत होते. थोडे हलके, पांढरे ढग या निळ्या प्रसन्न पार्श्वभूमीवर खूप आनंददायक वाटले.

घाट बावनगजाला संपत नाही. आजही पाऊण तास चढणीनंतर उतार सुरू झाला. सर्व बाजूंनी पर्वतराजीने वेढलेला हा घाट प्रदेश आहे. सर्व डोंगर बोडके, गवताचेही पान नाही; वाटेने बोरीची भरपूर झुडपे होती आणि सर्व चनिया मनिया बोरांनी अक्षरशः लगडलेली होती.

बोडके डोंगर, घाटसडक, झाडे अर्धा टक्कासुद्धा नाहीत, परंतु सर्वत्र मोकळे. त्यामुळे अकरानंतर उन्ह असले तरी सुखद वारा होता म्हणून मार्गक्रमण ठीक झाले. सावली दिसली की सॅक खाली ठेवायची अगदी बाभळीची जाळीदार सावली असली तरी पाच/दहा मिनिटे विश्रांती झाली की खांदे पुन्हा दहा किलो वजनासाठी तयार होतात.

मध्यंतरी एक मोठे वळण टाळण्यासाठी चढावर पायवाटेने निघालो आणि मुष्किलीने वर पोहोचलो. सरळ आलो असतो, तरी इतकाच वेळ लागला असता.

काल घाटरस्ता लागल्यापासून पिवळ्या फुलांची झाडे (झुडपे), रुईची झाडे नाहीशी झाली. एकूणच झाडे झुडपे नाहीशी होऊन रूक्ष ओसाड डोंगर/पठारमय विशाल भाग दृष्टीस पडू लागला.

सध्या मी मगचा डोक्यावर बांधतो. टोपी दोन दिवसापूर्वी सोडली, आज कानटोपीसुद्धा (जी सकाळी १०/११ पर्यंत असे) सोडली.

उन कमी आहे की मला उन्हाची सवय होतेय, की दोन्ही गोष्टी घडत आहेत, कल्पना नाही; परंतु मार्गक्रमण करताना मस्तकाचा दाह होत नाही आहे.

आज सकाळी भोजन मिळाले नाही. आजची वाटचाल पंधरा कि. मी. ची. दुपारी साडे तीन/चारलाच पाटी गाठले. एकेकाळी तालुक्याचे गाव म्हणून कल्याणची जी स्थिती होती तेच महत्व आज पाटीचे आहे. जोडीला महाविद्यालय तंत्रनिकेतन, शासकीय कार्यालये आहेत. बाजारपेठेतून हिंडताना लहानपणाच्या साऱ्या आठवणी जाग्या झाल्या. पाटी बाजारपेठेचे मोठे गाव. परंतु रात्री ८ वाजता सर्व व्यवहार बंद झालेले आढळले.



पायी गावात शिरताना नदीवरचा मोठा पूल पार करावा लागतो. पात्र मोठे आहे, परंतु एक लहानसा प्रवाह वाहताना दिसतो. गावात शिरल्यावर लगेच दुतर्फा बाजारपेठ सुरू होते. ''बाबाजी, चाय पिजीए।' असा

पुकारा आला म्हणून पाहिले, तर एक तरुण (हॉटेलचा मालक) आम्हांला आग्रह करीत होता. रात्रीच्या भोजनाचे निमंत्रणही त्याने दिले व साई मंदिरात थांबा, तिथे न्यायला येतो असे म्हणाला.

पुढे साई मंदिराकडे येताना एका मोटरसायकल स्वार गृहस्थाने थांबून, भोजनाची सर्व व्यवस्था देतो असे सांगितले. सॅक मंदिरात टाकून बाहेर पडलो. एका दुकानदाराने चहा पाजला आणि वर सांगितले की परिक्रमावासीयांना ते आवर्जून चहा पाजतात आणि गरीब परिक्रमावासीयांना गरजेचे कपडेही देतात.

याचे प्रत्यंतर आम्हांला लगेचच आले. आमच्याच जोडीला असलेल्या परिक्रमावासीयांनी रात्री भेट मिळालेल्या शाली आम्हांला दाखविल्या.

मंदिर छोटे, पाण्याची व्यवस्था नाही, मोठी वास्तू आहे पण उद्घाटन झालेले नाही. (नंतर कळले, की वायरिंग वगैरे अपूर्ण होते). त्यामुळे आम्ही जागेच्या शोधात निघालो.

गायत्री मंदिराच्या वाटेवर क्रिस नावाचा लहानगा कृष्णदूत भेटला. नदीकाठावरील गायत्री मंदिरात पाणी नाही, त्यासाठी पात्रातील एका झऱ्यापाशी उतरावे लागते. त्या झऱ्यापाशीच एक छोटेखानी शिवमंदिर अगदी जवळजवळ पात्रातच आहे. या मंदिरात मुक्कामाचे नक्की करून परतलो. मंदिरातील पुजारीण ताईंनी स्नान, निवास सोय होईल असे सांगितले व नदीपात्रातील निर्मनुष्य मंदिरातील मुक्काम टळला.



स्नानासाठी पंप सुरू झाला आणि क्षणात स्नान आटोपले. मुक्कामी आम्ही एक साधू आणि चारपाच परिक्रमावासी, ज्यात २ महिला होत्या.

रात्री भोजनासाठी बाहेर गेलो नाही कारण समिष/निरामिष भोजन एकत्र असे. फळे घ्यावीत तर बाजारपेठ कधीच उठून गेली होती.

पुजारी रात्री भेटले. त्यांनी पूर्ण कुकरभर खिचडी करून आम्हां सर्वांना तृप्त केले.

बाजारपेठेतील हे मंदिर रहदारीच्या रस्त्यावर असल्याने वास्तव्यास अयोग्य आहे. परंतु बाजूला बांधलेली धर्मशाळा उपलब्ध झाली की मात्र छान सोय होईल. हे सारे बांधकाम नोकरी सांभाळून पूजा करणाऱ्या याच माणसाने स्वतःच्या हिंमतीवर बांधले आहे. आतापर्यंत सौ. मंगल इतकी पुढे जायची की तिच्यात व आमच्यात १/२ / ३/४ कि.मी. अंतर पडायचे. परंतु आता थोड्याफार फरकाने आम्ही तिघेही एकत्र चालतो.

**दिवस ११ वा – मुक्काम बोकराटा हायस्कूल (प्राचार्य गणपति गं.गोरेकर, अधिक्षकः श्री. मनोज डावर)**

**(पाटी–आवली–सावरिया पानी–धूळघाटी–चौकी–बोकराटा)**

सकाळी ५।।। वाजता पाटी गाव सोडले. पूर्ण रस्ता घाट रस्ताच आहे, झाडे नाहीत. बहुदा मार्कण्डेय ऋषींच्या वेळी इथे डांबरी सडक असावी. त्यानंतर सरकारने इथे काही केलेले नाही, याचे पुरावे चालताना आढळतात.

असे असूनही खाजगी बस सुरू आहे. वैशिष्ट्य म्हणजे, प्रत्येक गावाजवळ हातपंप आहे. वस्ती इतकी विरळ आहे की हातपंपाजवळ एक दोन झोपड्याच दिसतात.

पाटीला आज बाजार होता. सकाळपासून रस्त्याने

धनगर दिसायला लागले. एक एक बकरा घेऊन चालत मंडळी पाटीकडे येत होती. कुणी बैल जोडी, कुणी मोठा कोंबडा काखेत मारून बाजाराला चालला होता. विचारले तर कळले, की बोकडाचे ४००० ते ५००० रुपये मिळतील तर कोंबडा ५०० रु. ना विकला जाईल. शाळेत निघालेल्या लहान बहिणभावांकडे दप्तराबरोबर पाउण एक किलो कापसाची पिशवी होती. त्याबदल्यात म्हणे चाळीस (४०)रु. मिळतील. घरातील (शेतामधून आलेले) धान्य-मूग-वाल, तूर थोड्या थोड्या प्रमाणात, गावातल्या वाण्याला विकून त्यांबदल्यात पैसे किंवा आवश्यक वस्तू नेणे हा प्रकार मी बघितला (मुरबाड विभाग), अनुभवला आहे.

सावरिया पानी गावाजवळ गव्हाची शेती दिसायला लागली. आता अगदी बालरोपे आहेत. इतक्या मोठ्या माळरान पठाराच्या कुशीत ही हिरवाई नेत्र सुखदायी वाटते. हिरवळ, म्हणजे चैतन्य, उत्साह आणि जीवनाची स्पंदनशील ओळख!

आत उन्हाचा तडाखा जाणवत होता. वाटेत डॉ. परशुराम यांच्याकडे सुग्रास भोजन झाले. वाटेत भुईमुगाची पोती टेम्पोमध्ये भरताना पाहिले व कळले की हे पीकही होते. आज बोडके असणारे डोंगर एकेकाळी घनदाट अरण्यांनी भरले होते, की वाघ गावात येऊन बसे, असे नंतर ऐकले.

फार दिवसांनी कोंबड्याचा आरव ऐकला. बडवानी नंतर बैलगाड्या मात्र दिसल्या नाहीत. कदाचित सडक/गाडी रस्ता असल्यामुळे असेल. प्रत्येक गावात सरकारी शाळा आणि स्वास्थ केंद्र या सुबक, छान रंगविलेल्या नेटक्या वास्तू मात्र नजरेत भरत होत्या. शासन निधी देते त्यातून दरवर्षी रंग दिला जातो. स्वास्थ्य केंद्र प्रसंगोपात उपयोगात येते. उदा. लसीकरण, औषध वाटप इ.; शाळा मात्र व्यवस्थित चालतात. हा सारा आदिवासी भाग आहे आणि मुले शाळेत जातात हे पाहून बरे वाटते.

सावरियापानी सोडल्यावर पुन्हा रुक्ष, ओसाड पठारी टेकड्या सुरू झाल्या. हा सारा घाटरस्ताच आहे. मी जो भाग रूख आणि ओसाड पठारांचा म्हणतो, तो आम्ही उन्हातून चालताना रुक्ष वाटतो. परंतु हाच सारा विभाग सकाळी सकाळी कोवळ्या उन्हात अतिशय रमणीय दिसतो. किती मोठा विरोधाभास हा!

दुपारी डॉ. परशुराम यांच्या घरी आमच्या पाठोपाठ आणखी सहाजण आले त्यांनाही त्यांनी भोजन दिले. आमच्या पूर्वीही काहीजण तिथे आले होते. बाहेर एक चूल होती. त्यावर त्यांनी भोजन तयार केले. त्यांना सदावर्त, तर आम्हांला तयार भोजन, यात मैय्याला काही सुचवायचे आहे का? की प्रत्येक जण आपल्या कर्माचे फळ चाखतो? इथे कुणाला कमी अधिक लेखण्याचा उद्देश नाही कारण सदावर्त घेणारे दोन्ही वेळा जेवू शकतात तर आम्ही मिळाले तर भोजन नाहीतर बिस्किटे खाऊन झोपतो.

साडेतीन नंतर बोकराटा गाव लागले. प्रवेशी (तोंडाशीच) शाळा होती. प्राचार्यांना भेटलो तर अतिशय आत्मीयतेने आमची सोय त्यांनी शाळेच्या अतिथीगृहात गेली.

शाळेचे वसतिगृह आहे त्यात ५० मुले आहेत. पम्प होता परंतु वीज नसल्याने पाणी नव्हते. शाळेमागे झरी आहे. तिथे आम्ही स्नानास गेलो असतो प्राचार्यांशी बोलत असताना मुलांनी झरी मधून पाच सहा बादल्या पाणी आणून अंगणात स्नानाची व्यवस्था केली. अधीक्षक मनोज डावर यांनी स्वतःच्या घरी आमच्या भोजनाची व्यवस्था केली होती. आसनस्थ झाल्यावर पाने वाढण्या अगोदर कुंड्यामध्ये हात धुण्यासाठी पाणी आणले गेले.

अतिथी देवो भव। मी हा अनुभव घेतला परंतु मी स्वतः इतका अगत्यशील कधी वागलो आहे का?

---

ज्यांना खरोखर शिकण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी जग ही एक शाळा आहे आणि जीवन हा एक उत्तम शिक्षक.

**दिवस १२ वा : बोकराटा**

मुक्काम : नर्मदा कुरी (रेताड भाग कमी होऊन माती वाढत चालली)

सकाळी ६.३० वाजता बोकराटा सोडले. दिवसभर भरपूर जंगलांतून डोंगर रांगा ओलांडत संध्याकाळी ५ ।। वाजता बाँदरियावदा गाठले. आज भरपूर चाल झाली.

इतके दिवस निर्वृक्ष डोंगरातून हिंडताना खूप मानसिक व शारीरिक क्लेश झाले होते. डोक्यावर उन्ह, दूरदूर पर्यंत दाट वस्तीची गावेच नाहीत. ३/५ कि.मी. नंतर दोन झोपड्या व हातपंप दिसे.



आज, जंगलातून जाताना सह्याद्रीच्या कुशीतून जातोय असे वाटावे अशी वृक्षराजी होती. सागाची मोठी झाडे, वाटेत गावात कुंपणाला वेत बांबू लावलेले दिसले. नळीची कौले छपरासाठी दिसायला लागली तर काही ठिकाणी मंगळोर कौलेही दिसली.

आज बोकराटा बाजार, त्यामुळे दिवसभर बाजारात विकण्यासाठी वस्तू डोईवर घेऊन जाणारे आसपासचे लोक पाहिले. दगड धोंड्यांनी भरलेल्या या डोंगररस्त्याने मोटर सायकलवर मागे खुर्च्यांची चळत लावून बोकराटा बाजारात निघाले होत. गाढवावर माल लादून चालले होते, माथ्यावर बांबूच्या टोपल्या घेऊन स्त्री, पुरुष बाजाराकडे चालले होते. ही चाल २० कि.मी. पर्यंतची असते. मोटर सायकलवाला म्हणाला, की एरव्ही दुसऱ्या रस्त्याने खेलियापासून ३० कि.मी. ऐवजी १३० कि.मी. अंतर कापावे लागते.



वाटेतील नद्यांचे पात्र रूंद पण खूप खोल, त्यातून एक वाहता ओहोळ, ठिकठिकाणी दगडी बांध घालून पाणी साठवून ते पिकासाठी उदंचन पद्धतीने पंपाद्वारे वापरतात. वीज २४ तास नसते तर कमी अधिक लोड शेडिंग असते.

सकाळी ११ नंतर खिंड ओलांडली तोपर्यंत ऊन लागले नाही, कारण गर्द वनराजी व डोंगराचे कडे सूर्यप्रकाश वरच अडवत होते.

बोकराटा सोडले आणि एका टपरीवाल्याने हाक मारून गावातच चहा दिला. पुढे लगेच एका दुकानात स्त्री बिस्किटाचा एक एक पुडा प्रत्येकास देत होती.

खिंड ओलांडून खाली उतरताना मध्ये एक गाव लागले भागतंबा. एक दुकान धान्य होते. भात घेणारे ते गुदामच असावे. दुकानापासून काही अंतरावर असलेल्या हापशीवर काही मंडळी स्नान करीत होती. दुकानदार चहा देतो म्हणाला, म्हणून थांबलो.

काही वेळाने तो एक बादली घेऊन हातपंपावर आला, तो चहाचे पाणी नेण्यासाठी आला असावा या

कल्पनेने आम्ही फार उशीर होतोय म्हणून सॅक पाठीवर मारल्या. परंतु 'चहा तयार आहे, घेऊन येतो' असे दुकानदार म्हणाला. चहा त्याप्रमाणे आलाही, परंतु अशोक उशीर झाल्याने तणतणतच गेला व त्याने चहा घेतला नाही.

आम्हांला उशीर होतोय, याच्याशी त्या दुकानदाराचा काही संबंध नव्हता. येथे आम्ही याचक होतो. शिवाय हे काही हॉटेल नव्हते, की ऑर्डर बरोबर चहा लगेच येईल.

डोंगर संपून आम्ही एका गावात चहासाठी थांबलो, तर चहा मिळेल पण आई आंघोळ करतेय थोडे थांबावे लागेल असे कळले.

आम्ही निघणार तेव्हढ्यात लगेच चहा आला. खरं म्हणजे ती बाई आमच्या समोरच अवघडून उभी होती आणि आमच्या उपस्थितीने तिचे स्नान लांबले होते. मग हा चहा आला कुठून? तिने नुकताच केलेला चहा घरच्या मंडळींसाठी होता, तोच आम्हांला दिला गेला. (घरच्यांसाठी तिने पुन्हा चहा केला.) उशीर झाला म्हणून चहा न घेतलेल्या अशोकला नर्मदामैय्याने तयार चहा इच्छेनुसार दिला!

डोंगर उतरताना एक गाव लागले, अंबापाडा! आदिवासी घरे २-५, एक दुकान. त्यात खिचडीची चौकशी केली तर समोरच्या झोपडीतील स्त्रीने आम्हांला छान खिचडी करून खाऊ घातली.

बोकराटा येथे पुढील मार्गाबद्दल अनेक वेगवेगळे सल्ले मिळाले. त्यांतील एक म्हणजे खेतिया येथे न जाता बांदरियावड नावाच्या गावात जावे. तेथे एक परिक्रमा कुटी आहे, तेथून पुढील मार्ग कळेल असे कळले. जुन्या वाटा बंद झाल्या, तरी काही नवे रस्ते दरम्यानच्या काळात झाले आहेत असे कळले.

डोंगररांगा संपल्या, सडक लागली व संध्याकाळी ५।। नंतर आम्ही ही कुटी गाठली. कुटीजवळचा हातपंप बिघडला होता म्हणून आम्ही बीरजी नावाच्या दुकानदाराच्या ओटीवर आश्रय घेतला व अंगणातील टाकीतील पाणी स्नानासाठी वापरले. नर्मदाकुटीची संकल्पना याच दुकानदाराची. याचे किराणा दुकान (छोटे) आहे व जोडीला चहा इत्यादी असा निर्वाह करतो.

**दिवस १३ वा : बांदरियावाड-लोणीखेडा**

**मुक्काम - शंकर नथु पाटील (स्वाध्यायी)**

खरगोन गावात शिरलो आणि महाराष्ट्र हद्द लागली हे कळले. चौकशी केली गावात चहा टपरी नाही, एका गृहस्थाने (नशेमध्ये असूनही) घरी नेऊन चहा पाजला. येथेच छान कोकिळस्वरही ऐकला. डोंबिवलीला नमस्तुभ्यम निमित्ताने याच भागातील सात जण माझ्या घरी दोन रात्री मुक्कामास होते. त्यांतील काशिनाथ भाऊशी माझा संपर्क होता. सहज फोन केला तर त्यांचा विश्वासच बसेना. आम्ही पायी निघालो असून एमपी मधील खरगाने नव्हे तर एमएचमधील खरगानेमधून शहाद्याकडे चाललो असून संध्याकाळी ५ पर्यंत पोहोचू असा निरोप दिला. सिग्नल नीट नसल्याने फार वेळा फोन होऊनही, आम्हांला नीट काही कळले नाही. काशिनाथ याच भागत राहतो की आणखी कुठल्या दुसऱ्या विभागात, ठाऊक नव्हते. फक्त 'ध्वहादा' तालुका इतकेच ठाऊक होते.

ऊन चांगलेच चढत होते. हवा स्वच्छ नसल्याने उष्मा फार होता. साडे अकराच्या आसपास दोन बाइकस्वार समोर दत्त म्हणून हजर झाले.

बाजूला एका शेतात थोडा वेळ सुखसंवाद झाला. हा सारा भाग काशिनाथच्या भावफेरी क्षेत्रातला.

प्रभाकर पाटलांच्या घरी सुग्रास भोजन झाले. त्यांनी लोणीखेडा या शहाद्याच्या अलिकडील गावातील संपर्क दिला, नंतर ते दांपत्य प्रती गावात निघून गेले (हे नंतर समजले).

पावणे दोन वाजता आम्ही भोजन स्थळ सुल्तानपूर सोडले. ऊन मी म्हणते होते. पाणी पिऊन पिऊन संपत आले. अधे मधे चिंचेची झाडे होती पण पुढे रस्त्याची दिशा बदलल्यावर ती ही सावली गेली.

आम्ही पाणी शोधत होतो. दरा फाटा चौकीत ही चौकशी केली – नभा!

लोणीखेड्यांच्या अलिकडे तीन एक कि.मी.वर मागून हळी आली. 'पाणी पिऊन जा', बाजूच्या शेतातून कुणी हाक देत होता.

आम्हांला पाणी पाहिजे हे याला कसे कळले असावे? गप्पा मारताना तो म्हणाला ब्राह्मणपुरीपासून पाण्याची व्यवस्था नाही, हॉटेल नाही कारण वस्ती नाही, हातपंप नाही म्हणून तो लक्ष ठेवून, परिक्रमावासींना हळी देत असतो. काठी आधार आहे तिचीही स्नान/पूजा करा असे त्याने सांगितले. आम्ही मात्र ही गोष्ट खरोखर अंमलात आणली नव्हती.

गणेश नगर गाठेपर्यंत आमची सर्व शक्ती संपली होती. शंकर कथ्थू पाटील स्वध्यायी आहेत. त्यांचा एक मुलगा/सून अमेरिकेत आहे. एक मुलगा पुण्याला असतो तो वडिलांनी नक्की केलेली वधू पाहण्यासाठी उद्या येऊ घातला होता.

पाटील कुटुंब एक मजली घरात राहते. खालचा मजला नुकताच नूतनीकरण केलेला असून रिकामा होता. त्यात आमची छान सोय झाली. भोजन तर होतेच होते. रात्री ८.३० च्या कुटुंब प्रार्थनेला अशोक व मी होतो. झोप लागल्याने सौ. मंगल नव्हती.

**दिवस १४ वा : लोणी खेडा–शहादा–प्रकाशा**

शहाद्याजवळ पोहे खाल्ले आणि चहाची चौकशी केली, 'आणून देतो' म्हटल्यावर आम्ही नको म्हटले. खाण्याचे पैसे मालकाने देऊनही घेतले नाहीत. थोडे अंतर कापले, तेच मागून हाका मारत कुणी लगबगीने आले. 'चहा घेऊन जा' अशी विनवणी! वेळ जाईल म्हणून आम्ही खोटे सांगितले, की आताच चहा पाणी झाले आहे. त्यातला चहा मात्र झाला नव्हता म्हणजे आम्ही अगदी खोटे नाही पण अर्धसत्य सांगितले. 'थांबा' म्हणाले, लगबगीने मागे फिरून घराकडे गेले आणि येऊन पैसे हातात ठेवले; चहासाठी!

पुढे निघालो. दहा वीस मिनिटांत आम्ही एका मंदिरासमोरुन जात असता भगवी वस्त्रे धारण करणाऱ्या एका बाबाजीने चहाचा प्रेमळ आग्रह केला.

आम्ही तो मोडू शकलो नाही, इतकी आर्जस्वी स्वर होता. मैय्याने जणू पणच केला होता की मंगलची चहाची इच्छा लवकरात लवकर पुरी करायचीय.

मार्गक्रमणा प्राप्त डांबरी रस्त्याने महामार्गाने सुरू आहे. मैय्यापासून आम्ही दूर आहोत. तिचे अस्तित्व आणि कृपा यांचा अनुभव सतत असला, तरी तिचे प्रत्यक्ष दर्शन नसल्याने बेचैनी आहे.

महाराष्ट्रात शिरल्यापासून, किंबहुना डोंगर ओलांडून आल्यापासून जमिनीचा रेताडपणा कमी होऊन माती वाढत चालल्याचे लक्षात येतेय.

शहादा–प्रकाशा मार्गावर किंबहुना खरगोन पासून दुतर्फा विस्तृत शेत जमीन आहे. शेकडो एकर जमीन एका दृष्टिक्षेपात दिसेल एवढी सपाटी आहे.

डोंगर ओलांडण्यापूर्वी एकटी दुकटी घरे दिसत पण नंतर चाळीवजा कुडाची/मातीची घरे दिसू लागली. बहुधा बाहेरून येऊन स्थायिक झालेले लोक असावेत विशेषतः बंदरियावडजवळ.

शहादा मागे पडून डायरखेडा आले. ऊन तापत होते.

११।/११।। चा सुमार. 'महाराज, भोजन झाले का?' बाजूच्या दुकानातून हळी आली. लगोलग एक गृहस्थ उतरून जवळ आले. 'प्रकाशाला पोहोचलो की पाहू' असे उत्तर आम्ही दिले. 'प्रकाशाला तुम्हांला काहीच मिळणार नाही, कारण १२।। वाजता तेथे सगळे आटोपते. तुम्ही इथेच जेवून घ्या! 'भोजन प्रसाद तयार आहे का?' आम्ही. 'चला, लगेच देतो'.

थोडक्यात, अन्नब्रह्माचा अवमान न करता आम्ही त्यांच्याकडे जेवलो. इतकेच नाही तर ते स्वाध्यायी आहेत हे ही कळले. गमतीदार गोष्ट म्हणजे आम्ही त्यांना आदल्या रात्री केलेल्या मुक्कामाचे ठिकाण सांगितले तर ते शंकर कथ्यू म्हणजे या वासुदेव पाटील/पटेल यांचे व्याही. हा काही योगायोग नव्हे, हे दैवी आयोजन आहे. वासुदेव पाटील ५१ वर्षाचे असून प्रतिवर्षी पदयात्रेनिमित्त १२०० कि.मी. चालतात हे ऐकून आमचा अहंकार पार विरघळून गेला. वासुदेवभाऊ चांगले वकिली शिकलेले, पुण्याचे पदवीधर असून, सारे सोडून इथे येऊन शेतीत स्थिर झाले आणि अत्यंत आनंदी व सुखी आहेत.

'पुढील मुक्काम तळोद्यापुढील आश्रावा गावात करा, व्यवस्था करतो' असेही म्हणाले.

प्रकाशाला तुलनेने लवकर पोहोचलो. केदारेश्वर मंदिरापर्यंत जायला वेळ लागला. केदारेश्वर धर्मशाळेचे प्रांगण लाद्या बसवून, छप्पर घालून प्रशस्त केले आहे पण तेथे प्रसन्न वाटत नव्हते. जवळच पुष्पदंतेश्वराचे छान शिवमंदिर टेकडी वर होते. त्याच्या सभामंडपात मुक्काम केला. तत्पूर्वी धर्मशाळेद्वारे खिचडी दिली गेली.

उसाची लागवड आहे पण रसवंतिगृह दिसले नाही; हा विचार अशोकला मी बोलून दाखविला, तोच समोर रसवंतिगृह दिसले.



पहिले दोन दिवस सकाळी स्नान झाले, नंतर दुपारी/संध्याकाळी नदीवर किंवा मुक्कामावर स्नान, कपडे पाण्यातून काढून वाळत घालणे, पाठोपाठ पूजाअर्चा, नंतर डायरी लेखन, अर्थात डायरी लेखन आणि गावातील दिवे जाण्याची वेळ एकच येते. सकाळी ५ वाजता उठून ६/६।/६।। ला आम्ही पुढील टप्प्यासाठी मार्गस्थ होतो.

शहाद्यापासून वाहनांची प्रचंड वर्दळ आहे. एकामागोमाग चालावे लागते. आम्ही रस्त्याच्या उजव्या बाजूने चालतो म्हणजे समोरून येणारी वाहने दिसतात. परंतु सूर्य सकाळी डाव्या बाजूने असल्याने झाडाच्या सावल्या लहान असल्या की नाइलाजाने ऊन टाळण्यासाठी धोकादायक डाव्या बाजूनेही चालावे लागते.

प्रायः आम्ही नर्मदेच्या दक्षिण तीराला असल्याने आणि आमचा प्रवास पूर्वेकडून समुद्राकडे पश्चिमेकडे असल्याने सूर्य सकाळी मागच्या बाजूला तर संध्याकाळी तोंडासमोर असतो.

(क्रमशः)

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली(पू.)
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

दुरावा आणि जवळीक आपल्या मनाच्या अवस्थेवर अवलंबून असते.

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय पंधरावा
## विषय : पुरुषोत्तम योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील १५ व्या अध्यायावरील हा लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. – संपादक*

### श्लोक १ ते ६ संसार वृक्ष वर्णन, भगवत् प्राप्तीचा उपाय

श्रीकृष्ण म्हणतो – सर्व छंद ही त्याची पाने आहेत. त्या अश्वत्थाचे मूळ वर आहे आणि शाखा खाली पसरल्या आहेत. याला अविनाशी म्हणतात. हे जो जाणतो त्यालाच वेदवित् असे म्हटले आहे. त्याच्या गुणांपासून वाढलेल्या आणि विषयांच्या कोमल पल्लवाने युक्त अशा शाखा खाली आणि वर पसरल्या आहेत आणि खाली मनुष्यलोकात कर्माशी संबंध ठेवणारी मुळे फार पसरली आहेत.

या अश्वत्थे वृक्षाचे वर वर्णन केल्याप्रमाणे स्वरूप या ठिकाणी दिसत नाही. अर्थात याचा अदि अन्त आणि आधार दिसून येत नाही. अत्यंत खोल अशा मूळांनी युक्त हा अश्वत्थ नामक वृक्षाला बळकट अशा असंग रूप शस्त्राने कापून, ज्यामुळे पुरातन काळापासून प्रवृत्ती चालत आली आहे त्या आद्य पुरुषाला मी शरणागत होत आहे. नंतर त्या स्थानाला धुंडाळले पाहिजे की जेथे, गेल्यानंतर पुन: वारंवार परत यावे लागत नाही.

ज्यांचा अभिमान व मोह नष्ट झाला आहे, ज्यांनी विषयासक्तीचे दोष जिंकले आहेत, जे आत्म्याच्या ठिकाणी नित्य रमतात, ज्यांच्या कामना दूर झाल्या आहेत, जे सुखदु:खादी द्वंद्वापासून मुक्त झाले आहेत आणि जे ज्ञानी आहेत; तेच त्या अविनाशी पदाला प्राप्त होतात. सूर्य चंद्र अथवा अग्नी ते स्थान प्रकाशित करावयास समर्थ नाहीत. ज्या ठिकाणी गेलेम्हणजे परत यावे लागत नाही, तेच माझे परम धाम होय.

### श्लोक ७ ते ११ जीवात्मा विचार

या मनुष्य लोकी माझाच सनातन अंश जीव होऊन राहिला आहे. तो प्रकृतीच्या ठिकाणी स्थिर राहणाऱ्या पंचेन्द्रियाना आणि सहाव्या मनाला आपल्याकडे आकर्षित करतो. जेव्हा हा शरीराचा स्वामी शरीर प्राप्त करतो वा सोडतो तेव्हा वायुने फुलातून सुगंध नेल्याप्रमाणे या इंद्रियांना तो आपल्या बरोबर घेऊन जातो. हा जीव कान, डोळे, त्वचा, जिव्हा, वाक आणि मन यांचा आश्रय करून विषयांचा उपभोग घेतो. शरीर सोडणाऱ्या शरीरात विषयोपभोग घेणाऱ्या अथवा गुणांनी युक्त होणाऱ्या या जीवाला मूर्ख लोक पाहात नाहीत, तर ज्ञानी लोकच याला पाहतात. प्रयत्न करणारे योगी आपल्या ठिकाणी राहणाऱ्या या आत्म्याला पाहतात. पण जे विचारहीन आणि संस्कारहीन असतात, ते प्रयत्न करूनही या आत्म्याला पाहू शकत नाहीत.

### श्लोक १२ ते १५ सहित परमेश्वराचे स्वरूप वर्णन

सूर्यात राहणारे जे तेज सर्व जगाला प्रकाशित करते, ते चंद्रात आणि अग्नीत आहे, ते तेज माझे आहे असे तू समज आणि मी पृथ्वीत प्रवेश करुन आपल्या बळाने सर्व भुते धारण करतो आणि रसरूप सोम बनून सर्व औषधींना पुष्ट करतो. मी ईश्वर प्राण्यांच्या देहांत शिरून प्राण आणि अपान यांनी युक्त असा वैश्वानर अग्नी बनून चतुर्विधा अन्नाचे पाचन करतो, मी ईश्वर सर्वांच्या हृदयात राहतो. माझ्यापासून सर्वांना स्मरण ज्ञान आणि अज्ञान यांचा अभाव (विस्मरण आणि अज्ञान) होतो. सर्व वेदांच्या द्वारे जाणण्यास मीच

---

जो शुद्धीवर असतो तो कधीही अहंकाराने पछाडला जात नाही.

योग्य आहे आणि मीच वेदान्तशास्त्र निर्माण करणारा वेदांचा ज्ञाता आहे.

**श्लोक १६ ते २० क्षर अक्षर पुरुषोत्तम**

या लोकी क्षर आणि अक्षर हे दोनच पुरुष आहेत. सर्व मूक्तांना क्षर म्हणतात आणि कूटस्थाला जीवाला, अक्षर म्हणतात. जो अविनाशी ईश्वर तिन्ही लोकांत प्रविष्ट होऊन त्याचे धारण पोषण करतो, तो उत्तम पुरुष तर या दोहोंहून भिन्न आहेत त्याला परमात्मा म्हणतात. ज्यामुळे मी ईश्वर क्षराच्या पलीकडे आणि अक्षराहून उत्तम आहे त्यामुळे मी ईश्वर लोकांत आणि वेदात पुरुषोत्तम या नावाने प्रसिद्ध आहे.

हे वीरा अर्जुना, जो ज्ञानी या प्रमाणे मला पुरुषोत्तम समजतो तो सर्वज्ञ होऊन माझी संपूर्ण भावे सेवा करतो. हे निष्पाप वीरा, अशा प्रकारे हे अत्यंत गुहशास्त्र मी तुला सांगितले आहे, हे भारता हे जाणून जीव बुद्धिमान व कृतकृत्य होतो.

दोन ठळक विचार या अध्यायात आढळतात. प्रथम ऊर्ध्वमूल अश्वत्थ विचार केला असून, नंतर पुरुषोत्तम विचार केला आहे. या अध्यायात पुरुषोत्तम योग सांगितला आहे. पुरुषोत्तमाहून मी भिन्न नाही याचा अनुभव घेणे हेच या अध्यायाचे ध्येय आहे. त्यासाठी त्याचे स्वरूप ओळखणे आवश्यक आहे.

**ऊर्ध्वमूल अश्वत्थ** – या अध्यायात अश्वत्थाचे वर्णन प्रारंभी तीन श्लोकांत केले आहे. हा अश्वत्थ वृक्ष कोणता? त्याची मुळे वर, शाखा खाली पसरल्या आहेत असा हा विचित्र वृक्ष कुठे आहे? ऊर्ध्वमूलं अध:शाखम्। हे वर्णन येथे व्यवस्थित जुळते – हा वृक्ष प्रत्येक मनुष्याच्या शरीरात आहे. मज्जासंस्था हे याचे नांव आहे. डोक्यात (मेंदूत) याची मुळे आहेत आणि संपूर्ण शरीरभर अनंत छोट्या मोठ्या शाखा पसरलेल्या आहेत. याचे जाळे सर्व शरीर भर आहे. ही तीन गुणांनी युक्त आहे. (गुण प्रवृद्धा) विषयरूपी अंकुरांनी युक्त आहे. (विषय प्रकार) कारण या संस्थेचा संबंध कोणत्या ना कोणत्या विषयाशी नित्य येतोच. यात बिघाड झाल्यास कर्मे व्यवस्थित होत नाहीत. या वृक्षाची पाने छंद, म्हणजे वेद म्हणजेच ज्ञान. हेच प्रयोजन मज्जातंतूचे आहे. याच्यामुळेच एखाद्या पदार्थाचे झटकन शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचे ज्ञान होते. कर्माची प्रेरणा व प्रत्यक्ष कर्म याचमुळेच घडते (कर्मानुबन्धीनि). ही मज्जा संस्था अत्यंत उपयुक्त आहे. तसेच जीवाला ही विषयात बद्ध करते. भोग लालसा, तर्क, विचार या साऱ्या मज्जा संस्थेच्या स्वाधीन आहेत. विचार शक्ती (तर्क) वाढली असता भक्तिभाव त्या प्रमाणात कमी होत जातो. याचा परिणाम शुष्क तर्क वाढविण्यात होतो. अखेर मनुष्य नास्तिक होतो. भोगप्रधान, व कुतर्कप्रधान जीवन वाढत जाते आणि सर्वत्र असमाधान वाढते. हे घालविण्यासाठी मनुष्य निरनिराळे उपाय शोधतो. तो उपदेशकाकडे जातो. त्याला चांगला उपदेशक भेटल्यास तो उपदेशक त्याला या शाखा छाटण्यास सांगतो. साधक त्या प्रमाणे करतो. तर्क कुतर्क आदी छाटून टाकल्यावर श्रद्धा अंकुरते आणि साधकाचा हार्दिक भाव उजळतो. साधकाला आता ध्यानात येऊ लागते की, कोणत्याही गोष्टीचा एकांगी विचार न करता भक्ती व तर्क यांचा सम विकास झाला पाहिजे. तर्काचा नाहक विचार छाटून टाकणेच योग्य सुविरूढ मूळ छिटवा। तत् पदं मार्गितव्य। त्याच्याकडे नेणारा योग्य मार्ग शोधला पाहिजे आपले गतव्य स्थान दृष्टीस पडले पाहिजे. तसे आपण पुढे पाऊल टाकू शकू. थोडक्यात, आवश्यक तर्क पाहिजे व गंतव्य स्थानाकडे जाण्याचे आहे ही दृष्टी स्थिर करण्यासाठी भक्ती पाहिजे. तर्काने दृष्ट मार्ग टाकावा व श्रध्देने श्रेयस्कर मार्ग स्वीकारावा, अशा प्रकारे श्रद्धा व तर्क यांच्या समन्वयाने साधक प्रगत होतो.

परमात्म्याचा एक अंश येथे जीव स्वरूपात कार्य

करीत आहे. विश्वाच्या संपूर्ण शक्तीचे अंश जाणले जातात. मज्जातंतूही तेथूनच आणला आहे. म्हणजेच, याचा संबंध भेट परमात्म्याच्या विश्व व्यापक शरीराशी आहे. येणे प्रमाणे जीव शरीराच्या साऱ्या शक्ती विराट पुरुषाच्या शक्तीशी संबद्ध आहेत. जीवाचा शिवाशी अखंड आणि अनन्य संबंध आहे. हा विचार ध्यानात आणून देतो, की जीव हा परत्म्याचा अंश आहे. यासाठी जीवाला शिवाप्रीत्यर्थ आत्मसमर्पण केले पाहिजे ही गोष्ट अनन्य भावाने सेवातत्परता एकात्वाची जाणीव यांनी घडते. या अनन्य संबंधाचे चिंतन केले पाहिजे. या वाचून दुसरा कोणता उपाय नाही. जीवात्मा पुरुषोत्तमाचा अंश आहे. याचा पुरुषोत्तमाशी अखंड अनन्य योग आहे याचे ज्ञान प्राप्त करणे, त्याचा अनुभव घेणे तसेच अशा पुरुषोत्तम विद्येचे शिक्षण सर्व समाजाला देणे हा या अध्यायाचा हेतू आहे. ही पुरुषोत्तम विद्या अत्यंय गुप्त आहे. समबुद्धीच्या ठिकाणी धारण करावयास योग्य आहे. असे हे ज्ञान आहे. ही विद्या जाणल्याने माणूस बुद्धिमान होतो व त्यांचे जीवन कृतकृत्य होते.

**परुषोत्तमाचे स्वरूप** – क्षर आणि अक्षर असे दोन पुरुष आहेत. या दोहोंहून श्रेष्ठ जो आहे त्याचे नाव पुरुषोत्तम होय. क्षर, अक्षर व उत्तम असे तीन पुरुष आहेत. उत्तम हा तिहींत उत्तम, म्हणून त्याला पुरुषोत्तम असे म्हणतात.

**क्षर** – पंचमहाभूते, मन बुद्धी, अहंकार आणि अक्षर जीवतत्त्व ही दोनही परस्परांशी समरस झालेली आहेत, तथापि हा भेद बुद्धिगम्प आहे. हा एकरूप मेळ जो आहे त्यालाच पुरुषोत्तम म्हणतात; म्हणजेच तो क्षर अक्षर याच्या पलीकडे आहे.

आमच्या शरीरात पंचमहाभूते, मन, बुद्धी, अहंकार आणि जीवभाव आहेत. पुरषोत्तमाच्या शरीराचे जे घटक, तेच आमच्या शरीरात आहेत. पुरुषोत्तमाचे शरीर विश्वव्यापक, त्याच्याच अंश मात्राने आमचे शरीर बनले आहे. ममैवांशो जीवलोके जीवभूत सनातन: । पुरुषोत्तमाचा अंश या ठिकाणी जीव झाला आहे. तो येथे प्रगट होऊन पंचज्ञानेंद्रियासह मनाला आपल्याकडे आकर्षित करतो. ज्या शरीरात प्रवेश करायचा आहे व ज्या शरीरातून बाहेर पडावयाचे आहे त्या वेळी हा जीव इंद्रियांना आपल्याबरोबर घेऊन येतो व जातो. म्हणून, हा शरीरात असताना इंद्रिये संवेदित होतात व हा नसताना त्यांची संवेदना नाहीशी होते. म्हणजेच, हा इंद्रियांचा अधिष्ठता होऊन सर्व विषयाचे सेवन करतो. विश्वात्मा हा अंशी जीव हा अंश होय. आमच्या शरीरात व आमच्यापाशी जे काही आहे ते सारे विश्वात्माच्या विशाल शरीरापासून घेतले आहे. जे पूर्णत: विश्व शरीरात आहे, तेच अंशत: आपल्या शरीरात आहे. संपूर्ण विश्व हे एकच अखंड जीवन आहे आणि विश्वात्मा हाच पुरुषोत्तम होय. जनन मरण सतत होत असताना विश्वात्म स्थितीत न्यूनाधिक्य होत नाही, तो जसाचा तसा राहतो.

हे विश्वरूप त्या विश्वात्म्याचेच आहे. हे साधकाच्या अनुभवाला येऊ शकेल काय? होय, असा अनुभव साधक घेऊ शकतो. प्रथम त्याने याचे ज्ञान करून घेतले पाहिजे. नंतर याचे चांगले मनन केले पाहिजे. हे ज्ञान झाल्यावर त्याच्या हातून निर्दोष व्यवहार घडेल. गुरुपासून मिळालेले ज्ञान व स्वत:च्या चिंतनातून येणारा अनुभव येऊ लागले. एव इदं सर्व पुरुषन: । आत्मा वा इंद सर्व । सर्व खलु इद ब्रह्म – ईश्वर म्हणून कोणी आहे त्यालाच आत्मा, ब्रह्म, वासुदेव आदि म्हणतात. हे श्रुतीने अवगत होते. तोच सर्वं काही भूत, वर्तमान, भविष्य आहे. श्रुती म्हणजे अप्रत्यक्ष ज्ञान.

**प्रत्यक्ष ज्ञान** – आधी पार्थिव तत्त्वाची एकता नंतर आप तत्त्व जगभर असल्याचे प्रत्ययास येते. त्याचबरोबर तेज तत्त्व सर्वत्र आहे याचा अनुभव सर्वत्र होणाऱ्या रूप दर्शनाने होतो. याच पद्धतीने वायू, यात आकाश, मन, बुद्धि अहंकार याचे अस्तित्व सर्वत्र असल्याचे अनुभवास येते. हे सारे अनुभव प्रत्यक्ष आहेत. या अनुभवांनंतर साधक म्हणू लागतो, हे ईश्वरा सर्व काही तूच आहेस. त्वं अक्षरं परम

वेदितव्य। मग आदित्पगतं तेज:। चंद्रमसि अग्नौच तेज: मामर्क विद्धि। चंद्र, सुर्य, अग्नि यांतील तेज माझेच आहे. मीच भूमीत प्रविष्ट होऊन रसात्मक सोम बनून सर्व वनस्पतींचे पोषण करतो. मी विश्वाचा स्वामी असून सर्व प्राण्यांच्या देहांत प्राण आणि अपान यानी युक्त होऊन चतुर्विध अन्नाचे पचन करतो. मीच सर्वांच्या हृदयात आहे माझ्या पासूनच स्मरण, ज्ञान, विस्मरण होते. मीच वेदांच्या द्वारे येथे आहे, मीच वेदान्ताचा कर्ता आणि ज्ञाता आहे असा साधकाला प्रत्यक्ष अनुभव येतो.

**अनुभवाची श्रेणी** – (तृ. पु.) तो ईश्वर सर्व काही आहे (द्वि.पु) तू ईश्वर सर्व काही आहेस (प्र. पु) मीच सर्व काही आहे. पहिले दोन अनुभव अपूर्ण तेचे तिसरा अनुभव पूर्णतेचा होय. प्रत्येक साधकाला याचा अनुभव घेता येईल आणि आपली उन्नति कितपत झाली हे अजमाविता येईल. मनुष्य, व्यक्ती, कुटुंब, जाती देश राष्ट्र येथ पर्यंत आपला संबंध व्यावहारिक स्तरावर जोडता येणे शक्य आहे. पुढील भाग वसुधैव कुटंबिक हा वैश्विक स्तरावरील संबंध मनाने जोडू शकतो. त्याच्याही पलीकडे चंद्र सूर्य आदि संबंध आत्मिक स्तरावर जोडणे शक्य होईल. चंद्र सूर्याचे तेज ही माझेच आहे. ही वरची पायरी आहे, साधक या पद्धतीने ह्या श्रेणी गाठू शकतो.

वरीलप्रमाणे अनुभव आला असता, प्रत्येकाशी होणारा व्यवहार निष्कपटतेचा होईल. इतर कोणी नसून मीच अनेक रूपांनी विश्वात वावरत आहे. या विविध रूपांशी होणारा व्यवहार माझा मीच करत असतो. तो सरळच असणार. इथे फसवण्यासाठी परका, अन्य कोणीच नाही. मीच अखंड एकरस, परंतु विविध रूपांनी नटलेला आहे. ही जाणीव साधकात निर्माण होईल. ही पुरुषोत्तम विद्या अशाप्रकारे व्यवहारात आणता येईल. वर्णाश्रम धर्माचे व्यवहार करून हा एकात्मभाव साधक प्राप्त करतो. एकाच विराट पुरुषाचे अंग प्रत्यंग असलेले वर्णात्मक स्वगद भेद व आश्रम व्यवस्थेने वैयक्तिक वयोनुरूप निश्चित केलेली आचरण पद्धती याने मनुष्य जीवनात उन्नत होत जातो. दुसरा वा परका समजून अत्याचार, लूटमार, धोकेबाजी आदि व्यवहार हा प्रत्यक्ष परमेश्वराशी होतो, हा समज पुरुषोत्तम योगाने येवू शकतो. विश्वरूपच पुरुषोत्तम आहे सारे माझेच आहे. त्यातून मीच प्रगट झालो आहे. विश्वात जे काही होत आहे, ते आत्मरूपी माझ्यापासूनच होत आहे, हे ओळखूनच मी माझेच हित करण्यासाठी झटणे, याच्यातच विश्वाचे हित आहे. जर हानिकारक अभद्र कारक झाले, तर ते सर्व माझ्या दोषांमुळे घडले म्हणून त्यात सुधारणा करण्यासाठी आत्मसमर्पण, आत्मशुद्धी व विश्वसेवा हेच माझे कर्तव्य ठरते. माझ्याशिवाय विश्वात दुसरा कोणीच नसल्याने चांगले वाईट होत असेल ते माझ्यामुळेच होत आहे यात शंका नाही. या प्रमाणे साधक परमेश्वराला ओळखतो. तोच सर्वज्ञ होतो. मूर्तीत ईश्वर आहे ही भावना बरोबर नाही. याने जगात पातके घडतात. सर्वत्र मी आहे, असा विश्वात्मभाव झाल्यास कोण कोणाला लुटणार? इथे दुजेपणा संपला. सर्वत्र एकच सत्ता सर्वभावाने व्यवहार करण्याचे निर्दोषत्व प्राप्त होते. तरच कलह होणार नाहीत. आज हा भाव नसल्याने झगडे होतात. विश्वरूपाच्या उपासनेने कोण कुणाला दूर ठेवील. व्यवहारात बेदिली स्पृश्यास्पृश्य ही भेदभावांची प्रत्यक्ष उदाहरणे आहेत. हे योग्य प्रकारे समजून अखंड एकरस व अव्यय ईश्वरी भावाने विश्वरूपाची उपासना केली पाहिजे. हे ओळखून आचरण करावे आणि जीवन कृतकृत्य करावे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

जगण्याला कारण नसणे, दिशा नसणे, नजरेसमोर उद्दिष्ट नसणं ही आजारी मनाची लक्षणे आहेत.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**जानेवारी २०१४ मध्ये झालेल्या कार्यक्रमांची नोंद**

- ३ जानेवारी रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती
- १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद यांची जयंती
- १३ जानेवारी रोजी राजमाता जिजाबाई जन्मदिन
- २३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती
- २८ जानेवारी रोजी लाला लजपतराय जन्मदिन
- ३० जानेवारी रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी

वरील सर्व कार्यक्रमांसाठी मुख्याध्यापक श्री. गवई, श्री. गावित उपस्थित होते.

- ४ जानेवारी रोजी शहर वाहतुक नियंत्रण शाखा, ठाणे आयुक्तालय यांच्या वतीने आयोजित या २५ वा रास्ता सुरक्षा अभियान २०१४, सांस्कृतिक कार्यक्रम डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात झाला. या कार्यक्रमासाठी मा. श्री. के. पी. रघुवंशी (पोलीस आयुक्त ठाणे) इतर मान्यवर इषा कोप्पीकर, नेहा राजपाल, स्नेहल शितोळे सिने कलाकार उपस्थित होते. आपल्या शाळेचा 'कृष्णलीला' हा नृत्याविष्कार राज्यात सादर झाला असून या कार्यक्रमास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. ७ जानेवारी रोजी सेन्ट्रल मैदान येथे सिने कलाकार आफताब, शिवदासानी व प्रथमेश परब यांनी प्रशस्तिपत्रक देऊन विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. त्याचा स्वीकार विद्यार्थी, सौ. तातळे व सौ. शेलार यांनी केला.

- ११ व १२ जानेवारी रोजी 'प्रारंभ कला ॲकॅडमी' व 'तन्वी हर्बल' यांच्या संयुक्त विद्यमाने बालगोपालांसाठी बालमहोत्सव कार्यक्रम झाला. शाळेतील सुशांत श्रीपती शिंदे यांच्या उल्लेखनीय सर्वांगीण व्यक्तिमत्वासाठी तन्वी स्टार ॲवॉर्ड देण्यात आले.

- १३ जानेवारी रोजी. इ. ७ वीची शैक्षणिक सहल कल्याणी व्हिलेज, वज्रेश्वरी येथे गेली.

- २१ जानेवारी रोजी ठाणे जिल्हा भारत स्काऊट्स व गाईड्स संस्था व जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी ठाण्यातील शाळेतील गाईड (६०) शिक्षक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे सौ. मंगला करंदीकर तसेच सौ. अल्मेडा जॉड्डीन, सौ. संगिता धनुकूटे व आपल्या शाळेतील सौ. कल्पना बोरवणकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



**स्काऊट गाईड विभागातर्फे खरी कमाई महोत्सव २८ जानेवारी रोजी संपन्न झाला. त्यावेळी मा. कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांना पुष्पगुच्छ देताना सौ. कल्पना बोरवणकर**

डॉ. बेडेकर विद्या मंदिरात 'खरी कमाई' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले व येणारा निधी खरी कमाई कार्डवर भरण्यात आला. मुख्याध्यापक श्री. गवई, ठाणे जिल्हा भारत स्काऊट गाईडचे जिल्हा संघटक श्री. संतोष दुसाने व कु. माधुरी जवणे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या महोत्सवास विद्या प्रसारक मंडळाचे मा. कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, तसेच

अनेक पदाधिकाऱ्यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांचे कौतुक करून प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे नियोजन सौ. कल्पना बोरवणकर व मा. मुख्याध्यापकांनी केले.

- ३० जानेवारी रोजी सामाजजिक वनीकरण विभाग, ठाणे आयोजित 'राष्ट्रीय हरितसेना' शिक्षकांसाठी कार्यशाळेत सौ. संगिता तातळे उपस्थित होत्या.

- ३१ जानेवारी रोजी ज्येष्ठ शिक्षिका सौ. मीरा लिमये यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

**फेब्रुवारी २०१४ मध्ये झालेल्या कार्यक्रमांची नोंद**

- १ फेब्रुवारी रोजी पारितोषिक समारंभ पार पडला. दैनिक ठाणे वैभवने वर्षभर 'बाल वैभव' उपक्रम राबवला. त्यात एकूण २० शाळांचा सहभाग होता. सामान्यज्ञान व प्रश्नमंजुषा या उपक्रमांत प्रत्येक शाळेतून अधिक गुण प्राप्त १० विद्यार्थ्यांस प्रमाणपत्र देण्यात आले. सहभागी झाल्याबद्दल सन्मानचिन्ह प्रमुख पाहुणे श्री. अजय जोशी (पितांबरी), मिलिन्द बल्लाळ (ठाणे वैभव) यांच्या हस्ते देण्यात आले. शाळेच्या सन्मान चिन्हाचा स्वीकार सौ. संगिता तातळे यांनी केला.

- १३ फेब्रुवारी रोजी इ. १० चा निरोप समारंभ व 'पारिजातक' प्रकाशन करण्यात आले. निरोप समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. कुंदन पवार व 'पारिजातक' प्रकाशनासाठी सौ. शीतल चौधरी, महाराष्ट्र 'श्री' व वि. प्र. मं. चे सभासद श्री. अनिरुद्ध जोशी उपस्थित होते.

- Oorja The Power of Dreams श्रीरंग विद्यालय आयोजित आंतरशालेय स्पर्धेत अनेक स्पर्धा झाल्या.

**१)** 'वनस्पती ओळखा' या स्पर्धेत मोठ्या गटात ऋषिकेश जाधव यास प्रथम क्रमांक व वेदांत कोंडे यास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

**२) विज्ञान प्रदर्शन :**

१. मोठ्या गटात 'मोशन डिटेक्टर लॅम्प' या प्रकल्पास प्रथम क्रमांक प्राप्त झाला. कु. सौरभ कदम, कु. शुभम पवार, कु. सुशांत शिंदे (इ. ९ वी) यांना रोख रु. १०,००० व सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देण्यात आले.

२. लहान गटात पारंपरिक व अपारंपरिक उर्जा स्त्रोत या प्रकल्पास प्रथम क्रमांक प्राप्त झाला. इ. ७ वी तील आदिती गिजे, प्राची कदम, समिक्षा पाटील यांना रु. ५००० रोख सन्मान चिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

३. तसेच 'पेरू' पासून ऊर्जानिर्मिती, या प्रकल्पास पहिले उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. अर्धव कोळी, सिद्धांत गायकवाड, ऋषी देवरे यांना सन्माचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धकांना सौ. धोत्रे, सौ. सोनवणे, श्री. जयराम गावित यांनी मार्गदर्शन केले.

- जीवनधारा आणि लोकमत आयोजित चित्रभारती ठाणे भव्य चित्रकला स्पर्धा २०१४ नुकतीच पार पडली. या स्पर्धेत कु. अंकिता तुकाराम कांदळकर हिला (इ. ९ वी) सर्वप्रथम क्रमांक प्राप्त झाला. रोख रु.२०,००० सन्मानचिन्ह.

- ज्येष्ठ समाज सेवक बाबा आमटे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प व आनंदवन येथील सामाजिक प्रकल्प हाती घेण्यात आले. या प्रकल्पात ऑपरेशन थिएटर बांधण्यासाठी निधी जमवण्यासाठी श्री. प्रदीप ढवळ लिखित 'ढूढू'चे सलग १२ प्रयोग दि. १५ व १६ रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात झाले. पहिल्या प्रयोगासाठी निधीच्या स्वरूपात या नाटकाचे तिकीट खरेदी करून शिक्षक विद्यार्थी पालकांनी उपस्थिती नोंदवली. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पहिल्या प्रयोगास सुरुवात झाली. श्री. प्रकाश आमटे, सौ. मंदा आमटे , शि. आमदार श्री. संजय केळकर, लेखक श्री. प्रवीण दवणे, श्री. अशोक चिटणीस, सौ. शुभा चिटणीस, अभिनेते श्री. उदय सबनीस आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

- डाबर च्यवनप्राश, दैनिक जागरण व फोर्टीज यांच्या

संयुक्त विद्यमाने संपूर्ण देशभरातून आरोग्यदायी स्वच्छता आहार मुलांसाठी उपयुक्त अशा २५०० शाळांचे निरीक्षण करण्यात आले होते. देशभरातून अंतिम २५ शाळांची निवड करण्यात आली. त्यांत आपल्या शाळेचाही क्रमांक लागला. केंद्रीय मंत्री श्री. कपिल सिब्बल यांच्या हस्ते आपल्या शाळेस मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे, शाळेचे, शिक्षकांचे, कर्मचारी, विद्यार्थी, पालकांचे विशेष कौतुक करण्यात आले.

• २०१३-१४ मध्ये झालेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत आपल्या शाळेतील इ. ६ वी मधील विद्यार्थी कु. प्रथमेश जाधव यास रजतपदक तर इ. ९ वी मधील ऋजुता काबाडी हीस सुवर्णपदक प्राप्त झाले.

• २८ फेब्रुवारी रोजी माननीय मुख्याध्यापक श्री. गवई सरांच्या उपस्थितीत सौ. धौत्रे व सौ. सोनवणे यांनी विज्ञान दिन साजरा केला. या कार्यक्रमात इ. ६ वी अ व इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर करून विज्ञानाचे महत्त्व सांगितले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिक्स आयोजित २०१३-२०१४ ज्युनियर मॅथ्स ऑलिम्पीयाडचे निकालः**
खालील मुलांनी पारितोषिक मिळविली.

| इ. | नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| ५ वी | केतकी धर्माधिकारी | उत्तेजनार्थ |
| ५ वी | शुभम करमपुरे | उत्तेजनार्थ |
| ८ वी | शांभवी जोशी | उत्तेजनार्थ |

**दहावीचा निरोप समारंभ**

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ३१ जानेवारी २०१४ रोजी सकाळी ९.०० वा. निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. डीन, मॅडम कोल्हटकर व मॅडम साठे यांनी मुलांना शुभेच्छा दिल्या व त्यांना संबोधितही केले. विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेसाठी व पुढील आयुष्यासाठी शुभचिंतन दिले.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही विद्यार्थ्यांनी त्यांचे कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव कथन केले. गाणी म्हटली. विविध वाद्ये सादर केली. तसेच संगणकांद्वारे त्यांच्या लहानपणाच्या आठवणीही पडद्यावर जिवंत केल्या.

**कराटे**

मुलुंड येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेच्या 'काटा' या प्रकारात कु. मानस कुलकर्णी याने कांस्यपदक मिळवून यश संपादन केले.

## जोशी बेडेकर महाविद्यालय

**अर्थशास्त्र विभाग**

जोशी बेडेकर महाविद्यालयात १० व ११ जानेवारी रोजी अर्थशास्त्र विभागाच्यावतीने 'पैसा, वित्त व आर्थिक वृद्धी उदयन्मुख मुद्दे' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला.

परिषदेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह व प्रमुख पाहुणे डॉ. नागराज यांच्या हस्ते झाले. त्या आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, पैसा व वित्त व्यक्तीच्या, देशाच्या विकासासाठीही आवश्यक आहे, पण याविकासाला नैतिकतेचे अधिष्ठान असावे.

डॉ. नागराज यांनी आपल्या मुख्य भाषणात काल, आज आणि उद्याच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे अभ्यासपूर्ण बारकावे स्पष्ट केले. भारताचा खरा विकास करण्यासाठी विविध उपाय योजनांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

विभाग-प्रमुख डॉ. दीपक साबळे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून परिषदेच्या आयोजनाची भूमिका मांडली.

परिषदेत विविध सत्रे पार पडली, यांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राध्यापकांनी आपले शोध निबंध वाचले. परिषदेचा समारोप मा. डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्या सर्व सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्मिता भिडे, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, प्रा. नीता पाठक, प्रा. कल्पना चंडोके, प्रा. प्रकाश जंगले, प्रा. सागर ठक्कर यांच्यासह सर्व प्राध्यापकांनी, विद्यार्थी, स्वयंसेवक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**विवेकानंद स्टडी सर्कल**

स्वामी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात डॉ. वरदराज बापट यांचे अतिथीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच स्वामी विवेकानंदांचे जीवन व त्यांची शिकवणूक या विषयावर चित्रांद्वारे विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

**जिमखाना व स्पोर्टस ॲकॅडमी**

- आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू अभिलाषा म्हात्रे यांच्या हस्ते ३० सप्टेंबर रोजी स्पोर्ट्स ॲकॅडमीचे उद्घाटन झाले. महाराष्ट्राची सुवर्णकन्या म्हणून गौरविण्यात आलेल्या अभिलाषाने विद्यार्थ्यांना कबड्डी व खेळातील करिअरविषयी मार्गदर्शन केले.

- महाविद्यालयातील 'महिला विकास कक्ष' व जिमखाना व स्पोर्टस ॲकॅडमी तर्फे विद्यार्थीनीसाठी स्व-संरक्षण प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले.

- ऑगस्ट २०१३ ला महिला क्रिकेट संघाचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले. प्रथमच मुलींचा क्रिकेट संघ मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन महिला क्रिकेट स्पर्धेत सहभागी होत आहे.

- जिमखाना विभागातर्फे जपानच्या क्योटो-सांग्यो विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध बैठ्या व मैदानी खेळांचे आयोजन केले गेले. मुंबई विद्यापीठाच्या निर्देशाप्रमाणे विविध वर्गांतील मुलींच्या संघासाठी लंगडीची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

तसेच विद्यार्थी वर्ग, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी बुद्धिबळ, कॅरम, टेबल-टेनिस इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

- महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडादिन अतिशय उत्साहात पार पडला. यात उत्कृष्ट ॲथलिट म्हणून निवड झालेले विद्यार्थी -

पदवी महाविद्यालय - (पुरुष) गणेश महाले<br>
(महिला) देवळी कोकाटे

कनिष्ठ महाविद्यालय - (पुरुष) जॉर्डन कार्व्हालो<br>
(महिला) छाया सकपाल

- महाविद्यालयातील बॅडमिंटनपटू वल्लरी बुकाणे ही राष्ट्रीय स्तरापर्यंत विविध स्पर्धांमध्ये सहभागी झाली व सुवर्णपदक विजेती ठरली.

- पुरुषोत्तम आवटे या बॅडमिंटनपटूने राष्ट्रीय स्तरावरील विजेतेपद पटकावले.

- निखिल सरनोबतला लांब उडी, उंच उडी व तिहेरी उडी या क्रीडाप्रकारात विद्यापीठ आणि आंतरविद्यापीठ स्तरावर सुवर्णपदके मिळाली.

अमित पवार याने लांब उडी, उंच उडी व तिहेरी उडी यांत सुवर्ण व रौप्य पदक मिळविले.

- प्रितीका श्रीवर्धनकर या महिला कुस्तीपटुची मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झाली.

सावनी काबरे हिने ५ कि.मी. धावणे, क्रॉस कंट्री या क्रीडाप्रकारात यश मिळविले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या वैभव ठाकरे व प्रगती दिक्षीत यांनी कराटे, किक बॉक्सिंग, बॉक्सिंग या प्रकारात सुवर्णपदके प्राप्त झालीत.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले.

पदवी महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने आंतर विभागीय स्तरावर प्रवेश मिळविला.

---

मुले स्वतःचा हट्ट पुरवण्यासाठी, तर मोठी माणसं भावनात्मक बावेगाचा निचरा करण्यासाठी रडतात. -सिग्मंड फ्रॉईड

प्रितेश गावकर या विद्यार्थ्याला ज्यूडो या क्रीडाप्रकारात 'बेस्ट ज्युडोका' हा पुरस्कार अमरावती येथील राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेत प्राप्त झाला.

२० व २१ जानेवारी रोजी आंतरमहाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कबड्डी खो-खो, लंगडी, टेबल-टेनिस, ॲथॅलेटिक्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांत २५ पेक्षा अधिक महाविद्यालयांनी भाग घेतला. यांतील विजेते संघ पुढीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| बास्केट बॉल | - सिडनॅहन महाविद्यालय |
| व्हॉलीबॉल | - के. एम. पटेल महाविद्यालय |
| कबड्डी | - आर. के. तलेरजा महाविद्यालय |
| खो-खो (पुरुष) | - आंबेडकर महाविद्यालय |
| खो-खो (महिला) | - जोशी-बेडेकर महाविद्यालय |
| लंगडी (पुरुष) | - आंबेडकर महाविद्यालय |
| लंगडी (महिला) | - जोशी-बेडेकर महाविद्यालय |
| फुटबॉल | - जोशी-बेडेकर महाविद्यालय |
| टेबल टेनिस व | - मॉडेल महाविद्यालय व बांदोडकर महाविद्यालय, विधी महाविद्यालय (ठाणे), आंबेडकर महाविद्यालय, एस. आय. एस. महाविद्यालय |

या महोत्सवातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी अत्यंत आकर्षक फिरता चषक आंबेडकर महाविद्यालय, वडाळा यांना प्राप्त झाला. डॉ. शकुंतला ए. सिंह यांच्या हस्ते या महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडला.

**क्रिसलिस २०१४**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या क्रिसलिस २०१४ हा मॅनेजमेंट व मिडिया फेस्टिवल दि. २९ व ३० जानेवारी रोजी महाविद्यालयात अतिशय उत्साहात पार पडला. यात ठाणे, मुंबई व नवी मुंबई परिसरातील सुमारे ४० महाविद्यालयांनी विविध स्पर्धांमधून भाग घेतला. क्रिसलीस या मेगाफेस्टिवलचे स्वरूप यावर्षी अधिकाधिक शैक्षणिक व बौद्धिक झाले होते. यावर्षीची क्रिसलिसची थीम होती. 'अतुल्य भारत ग्लोबल थॉटस भारतीय वेज'. जागतिकिकरणाच्या झंझावातात भारतीय संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करणारा व भारताच्या अतुलनीयतेचे वर्णन करणारी थीम यावर्षी निवडण्यात आली होती. महाविद्यालयाच्या बीएमएम विभागाच्या 'ऋत' वार्तापत्राचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार प्रकाश बाळ यांच्या हस्ते करण्यात आले. महोत्सवात आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात विद्या प्रसारक मंडळाच्या विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी भाग घेतला. संस्थेची उभारणी करताना त्यांचे अनुभव त्यांनी उपस्थितांना सांगितले.

मॅनेजमेंट व विज्ञापन गुरू रिएनकार्नेशन स्टॉक मार्केट, अकाउंट्स व मार्केटिंग तसेच फिल्मीस्तानसारख्या अनेक स्पर्धा या महोत्सवात घेण्यात आल्या. मृणाल कुलकर्णी या चतुरस्त्र व लोकप्रिय अभिनेत्रीने आपल्या 'अ रेनी डे' व 'यलो' या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने या महोत्सवात हजेरी लावली. तसेच फॅन्ड्री चे दिग्दर्शक ' नागराज मंजुळे' यांनी टीमसोबत या महोत्सवात हजेरी लावली. तसेच 'यलो'चे दिग्दर्शक महेश लिमये, 'रेगे' चे दिग्दर्शक योगेश राऊळ आणि 'अ रेनी डे' चे दिग्दर्शक राजेन्द्र तालक यांनी विद्यार्थ्यांना दिग्दर्शनातील बारकावे सांगितले. 'प्रेम पहिलं वहिलं' या चिपटाची टीम देखील महोत्सवात धमाल करून गेली.

डॉ. शकुंतला ए. सिंह यांच्या मार्गदर्शनाने महोत्सव उत्साहात पार पडला. प्रा. दीपक मुर्डेश्वर, प्रा. नम्रता श्रीवास्तव, प्रा. महेश पाटील, प्रा. नितीन पागी,प्रा. विनोद चंदवाणी, प्रा. भालचंद्र कारभारी, प्रा. विमुक्ता राजे व इतर प्राध्यापकांनी महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. रोहन गुप्ता, इशान दातार, भाग्यश्री विनीत, प्रियंका, श्रीनिवास, मानसी आदी विद्यार्थ्यांनी या महोत्सवासाठी अविरत प्रयत्न केले.

**'गंधर्व'१४**

१६ व १८ जानेवारी रोजी महाविद्यालयाचा गंधर्व

महोत्सवाचे ७ वे वर्ष उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या दृष्टीने या महोत्सवाचे आयोजन महाविद्यालय दरवर्षी करत असते.

'नवरस' या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव होता. मानवी भावनांचा अविष्कार नवरसांतूनच होतो. ही मध्यवर्ती कल्पना ठेवून गंधर्वचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ९२ महाविद्यालयाचा सहभाग होता. विद्यार्थी-शिक्षक यासर्वांसाठी एकूण ३३ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांसाठी देखील विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्षीच्या गंधर्वचे खास आकर्षण म्हणजे 'रोबो शोडाऊन' ही स्पर्धा; जी पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली होती. तसेच रॅप या स्पर्धेला देखील विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद प्राप्त झाला. यावर्षी सलग दुसऱ्यांदा पोतदार महाविद्यालयाने 'फिरता चषक' व सर्वोत्तम महाविद्यालय असे दोन्ही पुरस्कार पटकविले.

महाविद्यालयीन व आंतर महाविद्यालयीन शिक्षकांसाठी 'पाककौशल्य' आणि 'गायनस्पर्धा' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

पल्लवी लेले हिचे 'नवरस आविष्कार' या नृत्यसंकल्पनेवर आधारित नृत्य अप्रतिम होते. लोकसंगीत व पारंपरिक वाद्य या कलाप्रकाने सर्वांची मने जिंकली. जोशी बेडेकर महाविद्यालयाने यात बाजी मारली. डॉ. शकुंतला ए. सिंह यांच्या प्रोत्साहन व मार्गदर्शनामुळेच गंधर्व ची सांगता मोठ्या दिमाखात झाली. टॅलेन्ट ॲकॅडमीच्या मुख्य प्रा. मृण्मयी थत्ते यांच्याही अथक प्रयत्नाने 'गंधर्व' यशस्वी झाला.

महोत्सवाची विद्यार्थी प्रमुख 'ऋता वैती' हिने आपली जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली. या यशात टॅलेन्ट ॲकॅडमी व Student Council च्या विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे.

**BMM मराठी**

मराठी बीएमएम विभागाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

तृतीय वर्ष पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी 'सामना' वृत्तपत्र प्रभादेवी कार्यालयाला भेट दिली. 'श्रावणरंग या वृत्तपत्राचे प्रकाशन सामन्याचे मुख्य उपसंपादक राजेश पोवळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी पानांची मांडणी आणि सजावट या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

हा विभाग नेहमीच नामंकित मंडळींना निमंत्रित करीत असतो. IBN लोकमत या वृत्तवाहिनीचे संपादक निखिल वागळे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

- विवेक मेहेत्रे यांनी व्यंगचित्रे या वेगळ्या क्षेत्राविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.
- IT क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती अच्युत गोडबोले व आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू अभिलाषा म्हात्रे या मान्यवरांची मुलाखत या विभागाच्या विद्यार्थ्यांनी घेतली.
- चित्रपट दिग्दर्शक विजू माने व मनोरंजन क्षेत्रातील पत्रकार दिलीप ठाकूर यांचे अभ्यासपर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाले.
- प्रा. संतोष राणे यांच्या व्याख्यानाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली.
- प्रकल्प, तसेच अभ्यासासाठी BMM च्या विद्यार्थ्यांनी बाहेरील अनेक उपक्रमांना भेटी दिल्या. पु. ल. देशपांडे सभागृह, दादर येथे आयोजित जाहिरातीतील सर्जनशीलता या विषयावर आधारित शशिकांत गवळी यांच्या कार्यशाळेला हजेरी लावली. तसेच, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा माहिती कार्यालय ठाणे येथील स. शि. खराट यांची प्रकल्पासाठी भेट घेतली.

BMM च्या 'ऋत' या वार्तापत्रातील मराठी पानासाठी या विभागातील विद्यार्थ्यांनी प्राचार्या

डॉ. शकुंतला सिंह यांची मुलाखत घेतली.

अमोल मोरे, मीराबाई राजगुडे, किन्नरी जाधव या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमधून पारितोषिके मिळवली.

**स्पीकर्स ॲकॅडमी**

स्पीकर्स ॲकॅडमी तर्फे महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

लेखन, वाचन, संवाद, श्रवण यांचा विकास कसा करावा याबद्दल प्रा. विमुक्ता राजे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना प्राप्त झाले.

'Vitality of oratory skill in one professional career' या विषयावर प्रा. सीतालक्ष्मी अय्यर व प्रा. रिशा जीजेश यांच्या मार्गदर्शनाखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या मंडळातर्फे तीन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आहे.

उद्घाटनपर भाषणात प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासास संवादाचे कौशल्य वर्तवणूक व व्यवहार इत्यादी विषयांवर आपले विचार मांडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. जयश्री सिंह यांनी 'भाषण कौशल्य' या विषयावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. प्रा. मनोज पोथकर यांनी 'Effective presentation' skil या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रा. संतोष राणे यांनी निवदनाचे तंत्र या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. स्पीकर्स ॲकॅडेमी तर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

- निबंध स्पर्धा – विषय
  १) माझ्या एका मताचे महत्त्व
  २) Right to opt for Nota
  ३) भारतीय मतदाराची मानसिकता
- Slogan Writing competition
- वक्तृत्त्व स्पर्धा – विषय Right to opt Note

मंडळाचे सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यास प्राचार्या शकुंतला सिंह यांचा भौतिक वाटा आहे तसेच Talent Academy च्या मुख्य विमुक्ता राजे आणि त्यांचे सर्व सहकारी प्राध्यापक यांच्या अथक प्रयत्नांनी या मंडळात विविध कार्यक्रम उत्साहात पार पडतात.

'स्टुडन्टस फोरम' विभागातर्फे महाविद्यालयाचे ३१ विद्यार्थी मंडळाच्या विधी महाविद्यालय व रोटरॅक्ट क्लब ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित Model 'Indian Parliament session '13' यात सहभागी झाले. त्यात कुमारी आफरीन सय्यद यात द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थीनीने पारितोषिक मिळविले. तिने The Jave rile Justice (care and protection of children) Amendment Bill 2002 याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. तसेच द्वितीय वर्ष कला शाखेच्या ऋता गावडे या विद्यार्थ्यीनीस उत्कृष्ट पोशाखाचे पारितोषिक मिळाले.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने २५ जानेवारी या मतदार जागरुकता दिनाच्या निमित्ताने तरुण मतदारांमध्ये जागरुकता निर्माण होण्याच्या उद्देशाने (NATO) मतदानाचा नकाराधिकार या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. त्यात स्टुडन्टस् फोरमचे विद्यार्थी शालिन जैन यांनी प्रथम तर चिन्मय जावळे यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले.

दि. ५ फेब्रुवारी रोजी स्टुडन्टस फोरमच्या वतीने 'माध्यमात स्त्रियांचे चित्रीकरण' या विषयावर चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमास प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

**नवरंग**

'नवरंग' महोत्सव विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा इत्यादींच्या जल्लोषात साजरा झाला. विद्यार्थ्यांना

विविध स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येत सहभागी होवून महोत्सवास रंग चढविला.

नवरंगची सुरुवात रास गरब्याने झाली. मेहंदी, पेंटिग्जस्, T Shirt Painting, रांगोळी, Blind Art, प्रश्न मंजूषा, Fashion Show, Personality Development, कॅरम, खो–खो, धावण्याची शर्यत, गोळा फेक इत्यादी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. समारोपास महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, कवी श्री. प्रवीण दवणे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. त्यांच्या भाषणामुळे सर्व विद्यार्थी व प्राध्यापक वृंद मंत्रमुग्ध झालेत. प्राचार्या डॉ. शकुंतला ए. सिंह यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला.

नवरंग यशस्वी होण्यासाठी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांचे भरपूर प्रोत्साहन व मार्गदर्शन तसेच नवरंगच्या अध्यक्षा डॉ. स्मिता भिडे यांचे अथक प्रयत्न, सर्व प्राध्यापक वर्गाचे परिश्रम आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा उत्साह इत्यादी सर्वांचे अविरत परिश्रम होते.

**'व्यास सभा'**

'व्यास सभा' या कार्यक्रमांतर्गत दर शुक्रवारी शिक्षकांमध्ये विविध विषयांवर साधक–बाधक चर्चा करून शिक्षक वृंद आपले विचार मांडतात. शिक्षकांमध्ये चर्चिले गेलेले विषय होते–

- Celebration of Indian Festival.
- Devotion or Blind Faith
- Food Security Bill
- The season of Election
- Refresher / Orientation courses - Sharing of Experience.
- Experience in the college events - नवरंग, गंधर्व, क्रिसलिस
- Discussion on NAAC.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संमेलन (National ICT Summit 2014) २५.०१.२०१४**

डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या संमेलनाच्या मालिकेतील या शैक्षणिक वर्षाचे राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संमेलन जानेवारीमध्ये पाणिनी सभागृहात आयोजित करण्यात आले. या वर्षी संमेलनासाठी "Harnessing ICT for Business Growth" "उद्योग विकासासाठी माहिती तंत्रज्ञानाची जोड" या विषयसूत्राची निवड करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा मुख्य भर हा प्रभावी संपर्क आणि उत्पादकता यांवर असतो. भारतीय माहिती तंत्रज्ञान उद्योगाने जागतिक बाजारपेठेत तांत्रिक सेवा स्रोत सुविधा पुरवण्याच्या क्षेत्रात मोठा भाग व्यापलेला आहे . माहिती तंत्रज्ञान आता उद्योगसंस्थांच्या कानाकोपऱ्यातच काय तर माणसाच्या वैयक्तिक आयुष्यातही शिरले आहे, म्हणूनच या संमेलनामधून नवीन तंत्रज्ञान आणि त्या संबंधीचे विविध दृष्टिकोन या विषयी भाष्य करण्यात आले.

डॉ. अमित ओक (संचालक) यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले, आज माहिती तंत्रज्ञान (ICT) हे कोणत्याही उद्योग संस्थेच्या योजनेचा अविभाज्य घटक आहे. व्यवस्थापनाच्या जवळ जवळ सर्वच क्षेत्रांत याचा उपयोग प्रामुख्याने होताना दिसतो; या व्यापकतेचे कारण म्हणजे तंत्रज्ञानाचा लवचीकपणा, सार्वत्रिक उपलब्धता आणि ग्राहक केंद्रित दृष्टिकोन.

डॉ. पी. एम. केळकर (अधिष्ठाता ) यांनी सांगितले की तंत्रज्ञान हे कोणत्याही उद्योग संस्थेचे हृदयच बनले आहे; मग तो कोणताही उद्योग असो; कोणत्याही ठिकाणी असो, त्याचे उत्पादन कोणतेही असो. तंत्रज्ञान बाजारपेठेतील स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी महत्त्वाची

भूमिका बजावते आणि म्हणूनच उद्योगासाठी योग्य तंत्रज्ञानाची निवड करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरते. यासाठी व्यवस्थापकाला नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती असणे आवश्यक असते. अशी योग्य माहिती नसल्यास चांगल्या संधी गमावणे, तंत्रज्ञानावर केलेले खर्च वाया जाऊन नुकसान होणे यांसारख्या गोष्टी घडताना दिसतात. तसेच Square technology Intuit, Go Connect technology, Cisco's Business Express अशा काही अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणालींची त्यांनी थोडक्यात माहिती दिली.

संमेलनाचे प्रमुख अतिथी श्री. विवेक गोविलकर यांनी आपल्या बीजभाषणात सांगितले की माहिती तंत्रज्ञान प्रणालींचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे या क्षेत्रात ग्राहकाच्या किंवा त्या त्या उद्योग संस्थांच्या गरजांनुसार सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी हे एक महत्वाचे साधन ठरले आहे. उद्योग संस्था आता पारंपरिक कार्यालय पद्धतींवर अवलंबून न राहता, आभासी कार्यालयपद्धतींकडे वळू लागल्या आहेत. आता तुम्ही अमेरिकी पद्धती प्रमाणे भारतातही कार्यालयीन कामे घरून सहजतेने करू शकता. वेळच्या वेळी माहितीची देवाणघेवाण आता Clouds आणि Big Data सारख्या तंत्रज्ञानाने सहज शक्य झाली आहे. तसेच यामुळे व्यवहारात पारदर्शकता वाढण्यास आणि कारभारात सुरळीतपणा येण्यास मदतच होते. ग्राहककेंद्रित व गतिमान सेवा पुरविल्या जाऊ शकतात; थोडक्यात, त्यांनी (ICT ची) माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात खालील फायदे विस्ताराने सांगितले

- अधिक चांगल्या, जलद, आणि सुलभ माहितीची उपलब्धता
- सुधारित आणि आणि परस्पर संपर्क
- वाजवी किंमत आणि कमी प्रवास खर्च
- स्वयंचलन आणि प्रमाणीकरण
- आर्थिक आणि इतर संधी

संमेलनातील पुढील वक्ते श्री. प्रदीप आगळ यांनी Social Business या विषयावर आपले सादरीकरण केले. Social Networking च्या साधनांमुळे व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये परिवर्तन कसे झाले आहे. त्यामुळे उद्योग संस्थेचे कर्मचारी, ग्राहक, भागीदार यांचे परस्पर संबंध कसे दृढ होतात, नवीन व्यावसायिक मूल्ये आणि संधी कशा निर्माण होऊ शकतात, facebook, Linkedin, Twitter इत्यादींचा वापर करून संपर्क साधून भागधारक देखील उद्योग संस्थांच्या व्यवस्थापन संदर्भात आपल्या कल्पना मांडू शकतात. अशा विविध मुद्यांवर त्यांनी भाष्य केले.

त्यानंतर श्री. शंकर बोरकर यांनी Cloud Computing या विषयावर आपली मते मांडली. Cloud Computing च्या वापराचा वार्षिक दर सुमारे २६% नी वाढत आहे. तर २०१५ पर्यंत ICT क्षेत्रातील Cloud Computing चा वाटा २०% पर्यंत जाईल अशी शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. Cloud Computing मध्ये "Infrastructure as a Service"(IaaS) या अंतर्गत ग्राहकाला संगणकीय किंवा ICT च्या पायाभूत / मुलभुत सुविधा जसे स्मृती साधने (memory resources) इ. पुरविल्या जातात. तर Software as a Service, or ("SaaS") या अंतर्गत विविध आज्ञावली ग्राहकाला पुरवल्या जातात. "Platform as a Service" (PaaS) या अंतर्गत बाहेरील व्यासपीठाचा वापर करून ग्राहक व्यावसायिक स्वतःची वेगळी अशी व्यवहारोपयोगी अज्ञावाली लिहू व वापरूही शकतो. या पैकी (IaaS) चे सेवा क्षेत्र बरेच जुने आणि अमेरिकेत खूपच प्रसिद्ध आहे, परंतु हे क्षेत्र खूप फायदा मिळवून देत नाही. मात्र SAP च्या श्री. पीटर लोरेंझ यांच्या मतानुसार येत्या काही वर्षातच ("SaaS") व (PaaS) या दोन्ही क्षेत्रांना जोरदार चालना मिळणार असून अर्थव्यवस्थेत मोठी भर पडणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

शेवटच्या सत्रात MMS - I Sem. च्या विद्यार्थ्यांनी आधुनिक MS - Excel वर आधारित उत्कृष्ट सादरीकरण केले.

आभार प्रदर्शनाने संमेलनाची सांगता झाली.

---

परिस्थिती बदलण्याची वाट पाहाण्यापेक्षा ती सुधारण्याचा प्रयत्न करा.

## राष्ट्रीय वार्षिक चर्चासत्र ''विपणन क्षेत्रातील अमूलाग्र परिवर्तन / वैचारिक पालट''

दि. १५ फेब्रुवारी रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे 'विपणन क्षेत्रातील आमूलाग्र परिवर्तन/वैचारिक पालट'(Paradigm Shift In Marketing) या विषयांवरील वार्षिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्रची सुरुवात डॉ. अमित ओक (संचालक) यांच्या उद्घाटनपर भाषणाने झाली .

डॉ. विजय बेडेकर यांनी चर्चासत्राच्या विषया बाबत बोलताना सांगितले की Paradigm Shift हा शब्द किंवा ही संज्ञा अनेकदा फक्त बदल या अर्थाने वापरली जाते. खरेतर Paradigm Shift ही संज्ञा शास्त्रीयदृष्ट्या; संकल्पनेतील क्रांतिकारी परिवर्तन या अर्थाने व्यक्त केली गेली पाहिजे. या चर्चासत्राला त्यांनी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर चर्चासत्राच्या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या Paradigm Shift in Marketing - a research study report. Dr. V. N. Brims Publication 2014 या संशोधन अहवाल पुस्तिकेचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले या प्रसंगी डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सर संचालक) यांनी या संशोधन पुस्तिकेसंदर्भात व यानिमित्ताने करण्यात आलेले सर्वेक्षण आणि निष्कर्षासंदर्भात आपले विवेचन सादर केले.

संपादक समितीचे सदस्य व्यवस्थापन अभ्यास संस्थेमधील सहाय्यक प्रा. पल्लवी चंदवासकर, सहाय्यक प्रा. शोभना पणीकर व सहाय्यक प्रा. दीपक अग्निहोत्री यांनी देखील या संशोधन पुस्तिकेच्या निर्मिती प्रक्रियेसंदर्भात आपल्या अनुभवांचे कथन केले.

प्रकाशन सोहळ्यानंतर चर्चासत्राचे पहिले वक्ते श्री. अजय रावल (National Marketing Head, M/s. JK Ansell) यांनी Creating & Managing Brands या विषयावर सादरीकरण केले. Brand Positioning, Sales Strategy इत्यादी संदर्भात अनेक उदाहरणे सांगून स्वतः तयार केलेल्या जाहिरातींच्या संदर्भात अनेक अनुभवांचे कथन केले. विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरात सहभागी करून; ग्राहकांच्या गरजा ओळखणे, उत्पादनाचे नवीन प्रकार बाजारात आणणे, स्पर्धेमध्ये आपल्या उत्पादनाला जागा मिळवणे असे विविध महत्त्वाचे मुद्दे विद्यार्थ्यांना उदाहरणांतून समजावून सांगितले .

चर्चासत्राचे प्रमुख अतिथी श्री. सुशोभन दासगुप्ता (MD. J. & J. Medical, India, VP Diabetes Care Asia-Pacific) यांनी Paradigm Shift in Medical Product Marketing या विषयावर बीज भाषण सादर केले. सुरुवातीला Paradigm Shift या शब्दाबद्दल माहिती देऊन आरोग्याशी संबंधित किंवा वैद्यकीय उद्योगांमध्ये आरोग्यबद्दलची जागरुकता वाढल्यामुळे वैचारिक पालट कसा होत गेला याची अनेक उदाहरणे दिली; जसे 'मोफत पाणपोई ते विकतचे बाटली बंद पाणी' तसेच, ग्राहक केन्द्रीत व्यूहरचना, पूर्वी जाहिराती तयार करताना फक्त Branding चा विचार होत असे आता Return on Investment कडे लक्ष दिले जाते. J. & J. कंपनी मध्ये विपणनासाठी आता 4Ps ऐवजी 4Es चे प्रारूप J. & J. चे CREDO Base प्रारूप कसे वापरले जाते इत्यादी बद्दल माहिती त्यांनी आपल्या भाषणात सांगितली.

पुढील सत्रात (Dr. V. N. Brims) and Bombay Management Association यांच्या संयुक्त विद्यमाने "Awads of Excellence In MSMEs" या पुरस्कार वितरण सोहोळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी श्री. उदय पुरोहित (MD, Neptunus Power Plant Services Pvt. Ltd.) व श्री. मेहर सिंग रंधवा (MD, Randhawa Automobile Engineering Pvt.Ltd.) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले .

याप्रसंगी बोलताना डॉ. विजय बेडेकर यांनी शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक संस्था यांचे परस्पर

संबंध दृढ होणे गरजेचे असल्याचे नमूद केले आणि उद्योग संस्थांना सहकार्य साठी आवाहन केले.

चर्चासत्रातील पुढील वक्ते वामन हरी पेठे ज्वेलर्स चे श्री. आशिष पेठे यांनी 'Paradigm Shift in Jewellery Marketing' या विषयावर सादरीकरण करताना गेल्या वर्षात लोकसंख्या आणि शहरांची संख्या यांमध्ये झालेली वाढ, दूरदर्शन, दळणवळण, वाहतूक, या क्षेत्रात झालेला विकास, इंटरनेट आणि मोबाईलमुळे जवळ आलेले जग, सोने आयातीचे उदारीकरण, सोन्याच्या किमतींमध्ये झालेली वाढ, Hallmark या सोन्याच्या शुद्धतेची /दर्जाची खात्री देणाऱ्या चिन्हाची सक्ती संबधीचा नियम, या सर्व बाबींच्या प्रभावांमुळे सोने दागिन्यांच्या एकंदर व्यवसायात आणि विपणनात कसे परिवर्तन होत गेले, याबद्दल मुद्देसूद निवेदन केले. नवीन शहरांमुळे नवीन बाजारपेठेची उपलब्धता, उदारीकरण जागतिकीकरण यामुळे ग्राहकांना नवनवीन brands ची झालेली ओळख, स्थानिक सोनारांनी; राष्ट्रीय पातळी वर घेतलेली झेप , एका छोट्या सोन्याच्या दुकानाचे एक दोन माजली भव्य इमारती मध्ये झालेले रूपांतर, पारंपरिक दागिन्यांबरोबरच नावीन्यपूर्ण प्रकारच्या नक्षीच्या दागिन्यांना वाढलेली मागणी जुन्या पद्धतीच्या जाहिरातींपासून Online / Digital किंवा इंटरनेट वर करावी लागणारी जाहिरात, अशा विविध बाबींवर अनेक उदाहरणे देत व्यवसायातील वैचारिक परिवर्तना संदर्भात आपली मते व्यक्त केली.

पुढील वक्ते श्री. देव ज्योतुल्ला (Center Head, Korum Mall) यांनी 'Paradigm Shift in Retail Marketing' या विषयावर आपली मते मांडली. Korum Mall ला आजपर्यंत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मिळून सुमारे ३६ पुरस्कार मिळाले आहेत. हे यश साध्य करण्यासाठी Korum Mall साठीच्या जाहिरातीत आणि विपणन पद्धतीत त्यांनी कोणकोणते बदल आणि नावीन्य आणले या बद्दल आपल्या अनुभवांचे कथन त्यांनी या प्रसंगी केले.

त्यानंतर श्री. किरण खलप (Co-Founder, Chlorophyll) यांनी आपल्या व्याख्यानात Brand (पत) म्हणजे केवळ नाव किंवा बोधचिन्ह नसून, अनुभवदेखील आहे. आज Social Media च्या जाळ्यामुळे Branding साठी खूप वाव मिळतो / Brands ना खूप प्रसिद्धी मिळते; परंतु उद्योगांनीदेखील जबाबदारीने वागले पाहिजे, सामाजिक भान राखले पाहिजे असे सांगितले.

Paradigm Shift in Steel Industry म्हणजेच पोलाद उद्योगातील विपणन व्यवस्थेतील वैचारिक परिवर्तन या विषयावर बोलताना श्री. अभय पाटणकर (Marketing Head, Topworth Group of Cos.) यांनी सांगितले की, पूर्वी पोलाद बाजारपेठेत उद्योजकांचे वर्चस्व होते आणि आता या उद्योगातही ग्राहकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. पूर्वी या उद्योगांना Branding वगैरेचे फारसे महत्त्व नव्हते आता अनेक brands ची स्वतंत्र अशी किरकोळ विक्री दुकानेही अनेक ठिकाणी आहेत. M Junction सारखे संकेत स्थळ आज तयार करण्यात आले आहे तेथे प्राथमिक आणि दुय्यम अशा दोनही उत्पादकांना आपल्या उत्पादनांची खरेदी विक्री करता येते . ग्राहकांच्या मागणीनुसार पोलाद उद्योगांनीही आपल्या Brands ची सेवा केंद्रे सुरू केली आहेत. ज्यामध्ये अनेक सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या जातात.

चर्चासत्रातील शेवटचे वक्ते श्री. नितीन वैद्य (Founder, Dashmi Creations) यांनी विविध प्रसार माध्यमांत / प्रसार माध्यम उद्योगांत तंत्रज्ञानामुळे झालेला कायापालट, Social Media (Tweeter, facebook इत्यादी ) चे वाढते प्रस्थ्य, हे माध्यम कशा प्रकारे ग्राहकांच्या सवयींवर लक्ष ठेऊन त्या संबंधी माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करते त्यासाठी विविध व्यासपीठांचा कसा वापर करून घेतला जातो व याचा उपयोग भविष्यकाळात Branding किंवा विपणनासाठी कसा केला जाऊ शकतो इत्यादी संबंधी रंजक माहिती दिली.

डॉ. अमित ओक (संचालक) यांनी केलेल्या समारोपाच्या भाषणाने चर्चासत्राची सांगता झाली.

---

चूक होईल या भीतीने काहीच न करण्यापेक्षा काहीतरी करणे उत्तम.

# खरंच सांगतो, ती वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत!

*एप्रिलमध्ये असणाऱ्या जागतिक पुस्तक दिनानिमित्ताने - संपादक*

वाचनाचा आराखडा तयार करण्यापूर्वी पुस्तकं वाचकांपर्यंत नेणाऱ्या मंडळींना आणि वाचकांना एक कळकळीची विनंती करायची आहे. ती अशी :

माझ्या प्रिय पालकांनो-
शिक्षक सहकाऱ्यांनो -
आणि पुस्तकवेड्या ग्रंथपालांनो,
आता शिकवा मुलांना महत्त्व पुस्तकांचं,
पुस्तकांच्या वाचनाचं. जे जीवनाला आकार देतं आणि
बहुश्रुत करतं
विचार करायला शिकवतं तेच खरं वाचन हे
ध्यानात आणून द्या त्यांच्या.
नुसतं पोथीनिष्ठ करू नका मुलांना
आणि करूनही घेऊ नका केवळ पोपटपंची!
होऊ द्या त्यांना जाणीव 'गावगाड्या' ची
आणि 'गावगाड्याबाहेरच्या' आयुष्याची.
बेबी कांबळेंचं 'जिणं' त्यांना समजायला हवं
तसंच 'उपरा' असणं म्हणजे काय असतं ते ही
कळायला हवं.
'बलुते' दारीची वणवण बोचली पाहिजे त्यांच्या
खोल आतवर 'आठवणीतल्या पक्ष्यां'सारखी.
आणि 'माणसं' कळायला हवीत रस्त्यावरची.
'कोसबाडच्या टेकड्या' त्यांना चढायला शिकवा.
आणि शिकवा त्यांना, की आदिवासी समजून
घेताना दमायला होत नसतं तर
त्यातून 'जेव्हा माणूस जागा' होतो.
तेव्हा या जाग्या झालेल्या माणूसपणामुळेच
'माता नर्मदा' ही समजते. आणि
समजतं 'भारतीय स्त्रीजीवन'
व दिसू लागतात 'स्त्री-संघर्षाची नवी रूपे'.
या नव्या रूपातच त्यांना जेव्हा भेटेल एखाद्या
'अरुणाची गोष्ट'
तेव्हा 'इच्छा नसताना' ही कसं वागयचं ते
आपसूक उतरेल मनात त्यांच्या.
नितळ झालेल्या त्यांच्या मनात
उतरलं जाईल 'निरामय कामजीवन'
तेव्हा 'एड्सचे दुष्परिणाम' सांगायची
वेळच येणार नाही आपल्यावर.
'वैद्यकसत्तेत' ला 'क्लोरोफॉर्म' त्यांना गुंगी आणेल
अथवा 'कॅन्सरची कहाणी' वाचून
'लाखमोलाचा जीव' कसा वाचवावा
म्हणून ते भयभीत होतील. पण त्यांना द्या
समजावून की, संगीता वझेसारखी तरुणी
ही 'कॅन्सरचा यात्रा' करून 'कॅन्सरशी झुंज'
देऊन आली आहे.
'उंच माणसांच्या बेटा' वरचे हे केवळ अपघात असतात
हेही त्यांना सांगा पुस्तकं दाखवून.
नेहमीच त्यांनी आपल्या 'अवतीभवती'
बघायला शिकलं पाहिजं असं वाटत असेल तर,
'जगावेगळं जग' पाहायला शिकवा त्यांना
'इदं न मम्' चा मंत्रघोष आत्मसात करायला सांगत.
'हमाल पंचायत' ते जेव्हा वाचतील
तेव्हाच ते टाकून देतील पाठीवरचा
लाजेचा बोजा दूरवर आणि उतरतील


'नरकसफाई' च्या कार्यात.
त्यांना स्वच्छ सांगा की, प्रत्येकाने
'कार्यरत' व्हायलाच पाहिजे असं नसतं.
'संकल्प' वाचूनही येतं भान चळवळीचं.
फक्त त्यासाठी 'विमुक्तावन' ही वाचायला लागतं.
'तराळ अंतराळा'त शिरून तळमळीनं.
या तळमळीतून ते 'कोणाची जात चोरायला'
लावण्याचं पातक करणार नाहीत.
'मजल दरमजल' करत त्यांच्या जीवनाचा प्रवास
होईल केवळ फक्त त्यांचाच वाचन
नावाचा 'माझा प्रवास'
तेव्हा त्या प्रवासातच
त्यांना कधी भेटेल 'तोतोचान'
तर कधी 'पश्चिमेचे पुत्र'
तर कधी 'सिसिफस' ची जीवघेणी धडपड
'सारे प्रवासी घडी' चे हेही त्यांना कळेल त्यातूनच.
आणि ते जेव्हा तुडवतील 'कथांच्या पाऊलवाटा'
तेव्हा त्यांना
'पाडस' मधल्या मुलाचा
कलासक्तपणाही शिकवायला हवा.
तसं त्यांनी स्वीकारायला हवं 'जंगालाचं देणं.'
'कोवळी उन्हे' जशी त्यांच्या अंगारवर पडायला हवीत
तसं 'व्यक्ती आणि वल्ली' वाचून
खळखळून हसायला हवं त्यांनी.
यदिंचा 'महाराष्ट्र' वाचून
खरा इतिहास स्फुरण पावून वाहायला हवा
त्यांच्या नसानसांतून!
तसं 'गतशतक शोधता शोधता'
'समाज स्पंदने' ही कळायला हवीत
त्यांना एकोणिसाव्या शतकातली.
फुले, आंबेडकर वाचून त्यांच्या आयुष्याचं चरित्र
निर्माण करायला जसं ते शिकतील.
तसंच ते शिकतील 'वडीलधाऱ्या माणसां'चा
आदर करायला. माझ्या प्रिय पालकांना,
शिक्षकांना आणि ग्रंथपालांनो,
द्या त्यांना नजर विज्ञानाच्या दृष्टीची
तेव्हाच त्यांचं नातं जडेल आकाशाशी आणि
मातीशीही. अपयशातनू होतात 'अंधश्रद्धेचे बळी'
म्हणून कडक नजर ठेवा त्यांच्या वाचनावर.
त्यांना आवर्जून सांगा –
कथा–कादंबऱ्या नसतात केवळ
मनोरंजनासाठी, तर त्या असतात
जीवनातले संघर्ष समजून घेण्यासाठी,
माणसा–माणसांमधले संबंध उकलून दाखवण्यासाठी.
अशा कादंबऱ्या ते जेव्हा वाचतील
तेव्हा ते पडतील बाहेर आपल्या 'कोसला' तून.
त्यांच्या मनातला 'पारवा' गाऊ लागेल.
तेव्हा त्यांचा 'प्रवासी पक्षी'
स्वतःच्या आयुष्याची 'सनद' जाहीर
करेल 'नक्षत्रांचे देणं' दिल्यासारखी.
त्यांच्या मनातला 'भटकापक्षी' बसू दे
पुस्तकांच्या ओळी–ओळींवर.
मग तेच 'अक्षरसंगती'त गात राहतील आयुष्यभर
'परि तैसे हे नोहोचि देवा
देखिला अक्षरांचा मेळावा
आणि विस्मयाचिया जीवा
विस्मयो जाला!'
पुस्तकं हे सर्व शिकवतील त्यांना
पण त्याआधी पुस्तकं न्या तुम्ही त्यांच्यापर्यंत
किंवा त्यांना पुस्तकांपर्यंत.
खरंच शिकवा त्यांना पुस्तकांचं महत्त्व.
सांगतो सर, ती फारच वाचन–
उत्सुक गोड मुलं आहेत.

**– डॉ. प्रदीप कर्णिक**

●●●

ज्याच्याकडे इतरांसाठी स्मित हास्यांची उणीव असेल तो खरोखरच गरीब असतो.

## स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,
दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल–सागर–सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.